Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला---सोमवार तारीख ४ माहे आक्टाबर सन १९१५ ई० [ अंक ३९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊ घेण्याची वहिवाट आहे.

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नो. नं २

## अस्सल अंगुरी.

# हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।= ता. शुद्ध शिलाजीत. ॥-।।- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

नो० नं० ८

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. ४

## ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा **वर्षारंभ** माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून **७२** पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** व **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास **'वैशेषिक दर्शन'** बक्षीस

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

## आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १० रु आणि वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३

## नोटीशीचे दर

**दर ओळीस दीड आणा.**
**हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.**
**नोटीस सुवाच्य असली पाहिजे.**

**सूचनाः-** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकीलपत्राचे, परत भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर

## श्री दत्तात्रय अलंकारालय
## कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळ टीका, मुद्र, अग्रफुलें सार्खी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारे, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो. नं. १९३

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह**
**पृष्टसंख्या ६००; विषय १०० वर आवृति ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील **नटेली,** लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुवाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरण शास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, मारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकानीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्रबिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ३६४

## नोटीस

नोटिस देशमी महमूदाबी मर्द बाजित- खां मु रा. मोतीबेग वा गुलाबबेग यांचे घरीं माळीपुरा मलकापूर

हीसः—

खालीं सही करणार नोटिशीनें कळवितो कीं, सुमारें १६ माहिन्यापूर्वीं तुझें माझें लग्न पंचा समक्ष १००० रुपयाचा माहेर ठरून झालें. व लग्नापूर्वीं मी लिहून दिलेलें व्यवस्थापत्र रद्द आहे. असें लग्नांतच पंचा समक्ष ठरलें. व त्याप्रमाणें व्यवस्थापत्र तुझे बापानीं परत ही दिलें. ह्मणून मी माहेर हजार रुपयाचा कबूल केला. मला दोन बायका असून त्यांची संतती वाचत नाहीं, सबब तुला केलें. तुझ्या भावाच्या लग्नाकरितां तुझ्या बापानें माझे येथून तुला दागिन्यांसह ८ महिन्यापासून नेलें. त्यावर तुझें व माझें दर्शन नाहीं. मी ६-७ वेळ तुला नेण्यास पाठविलें व मी हीं आलो असतां तुझे बापानें पाठविलें नाहीं. तरी तुला या नोटिशीनें कळवितो कीं, नोटिस पावतांच ८ दिवसांत दागिन्यांसह तूं माझ घरीं निघून यावेस. न आल्यास पुढें मी तुला वागवणार नाहीं. व तुझ्या माहेराचा व अन्नवस्त्राच्या कोणत्याच हक्काबद्दल मी जबाबदार होणार नाहीं. क. ता. २८-९-१५

सही

बाजिदखां वा साहेबखां रा. वडाडी

बु॥ द. खु.

नो. नं. ४६७

## हिंदुस्थान सरकाराकडून काढण्यांत येणारें मुदतबंद कर्ज.

पोष्ट आफिसा मार्फत कर्ज द्यावयाचें असल्यास तें कोणत्या अटीवर देतां येतें या संबंधीं नोटीस.

या सालीं सरकार निराळ्या स्वरूपाचें कर्ज काढीत आहे, व त्यावर शेंकडा ४ टक्के व्याज देण्यांत येईल. ह्या कर्जाची पूर्ण फेड फार उशिरां ह्मणजे सन १९२३ चे नोव्हेंबर महिन्यांत करण्यांत येईल. परंतु सन १९२० चे आक्टोबर महिन्या नंतर केव्हांही तें फेडून टाकण्याचा हक्क सरकारनें आपले स्वाधीन ठेविला आहे.

२ कलकत्ता, मद्रास, मुंबई व इतर मोठमोठीं शहरें येथून अर्ज येऊन मामुली पद्धती प्रमाणें ४॥ कोटींचें कर्ज आधींच जमा झालें आहे; आणि ह्या रकमेपुरतें तरी कर्ज घेणें आतां बंद करण्यांत आलें आहे. परंतु लहान रकमांनीं कर्ज देण्याची ज्यांची इच्छा असेल मग ते सेव्हिंग्स बँकांमध्यें ठेवी ठेवणारे असोत वा नसोत, अशा इसमांना सेव्हिंग्स बँकेचें कामकरणाऱ्या अगदीं नजीकच्या पोष्ट आफिसाचे मार्फत कर्ज देण्यासाठीं आणखी एक खास संधी देण्यांत येत आहे.

### कर्ज कसें द्यावें.

३ ता० ३० आक्टोबर पर्यंत केव्हांही पोस्ट आफिसाचे मार्फत अर्ज पाठवितां येतील.

४ अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांहून कमी नाहीं व शंभरांनीं बरोबर भाग तुटेल इतक्या रकमेसाठीं द्यावा. व कोणाही एकाच अर्जदारास ५००० हून जास्त रकमेकरितां केव्हांही अर्ज करितां येणार नाहीं.

टीपः— शेंकडा ३॥ टक्के व्याजाच्या कर्जाच्या प्रॉमिसरी नोटा जरी यापूर्वींच कोणी पोस्ट आफिसामार्फत विकत घेतलेल्या असल्या तरी त्याला ह्या नवीन कर्जापैकीं ५००० रुपयांपर्यंत कर्ज देण्यासाठीं अर्ज करितां येतो.

५ ज्याला अर्ज करण्याची इच्छा असेल त्यानें पुढें दिलेला अर्जाचा नमुना भरावा. सेव्हिंग्स बँकचें काम करणाऱ्या कोणच्याही पोस्ट आफिसांत हा नमुना मिळेल. पण अर्जाबरोबरच जितकें कर्ज देण्यासाठीं तो अर्ज असेल तितकी रक्कम अर्जदारानें भरली पाहिजे. अर्जदाराची जर सेव्हिंग्स बँकमध्यें ठेव असली तर त्या ठेवीचा ही या कामाकरितां त्यास उपयोग करितां येईल, किंवा स्वतंत्र रोख रक्कम देतां येईल अर्जदारानें पोस्ट आफिसांत स्वतः जावें किंवा दुसऱ्या कोणास पाठवावें. दिलेल्या प्रत्येक रकमेबद्दल पावती देण्यांत येईल.

६ अर्जदार जितकी रकम देईल त्या सर्व रकमेइतक्या त्याला शंभर शंभर रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा देण्यांत येतील.

### प्रॉमिसरी नोटा कोणी ठेवाव्यात.

७ ह्या नोटा अर्जदारानें आपल्या स्वतः पाशींच ठेवाव्यात. अगर मर्जीस वाटल्यास आपल्यातर्फे त्या पोस्टाचे अधिकाऱ्यांजवळच राहूं द्याव्यात. कोणची पद्धति आपणास पसंत आहे. हें अर्जाचा नमुना भरतांना त्यानें नमूद करावें. नोटा आपल्या जवळच ठेवण्याची त्याची इच्छा असली तर त्या त्याचे हवालीं करण्याकरितां तयार होऊन आल्या ह्मणजे पोस्ट आफिस त्याला तसें कळवील. आणि तो त्या घेण्याकरितां स्वतः हजर झाला ह्मणजे त्या त्यास देण्यांत येतील. त्या नोटा पोस्ट आफिसांतच राहूं देण्याचें त्यानें ठरविलें तर त्याला पुन्हां पोस्ट आफिसांत जाण्याचें कारण नाहीं त्या नोटा आपणाकडे आल्या आहेत, व अर्जदाराकरितां त्या ठेवण्यांत आल्या आहेत, असें पोस्ट आफिस अर्जदाराला योग्यवेळीं कळवील. पुढें कधीं जर ह्या नोटा आपले पाशींच ठेवाव्या अशी त्याची इच्छा झाली तर पोस्टाचे अधिकारी त्या त्याचे स्वाधीन करितील.

### व्याजाची अदाई.

८ शेंकडा ४ टक्यांप्रमाणें व्याज वर्षांतून दोन वेळां ह्मणजे शेंकडा २ टक्के मे महिन्याचे ३१ वे तारखेस व २ टक्के नोव्हेंबरचे ३० वे तारखेस दरसाल देण्यांत येईल. कर्ज दिल्याचे तारखेपासून तों येत्या नोव्हेंबरचे ३० वे तारखे पर्यंतच्या तुटक मुदतीसाठीं जें व्याज होईल तें, अर्जदार नोटा आपल्यापाशींच ठेवील तर, त्या नोटा त्याचे स्वाधीन करण्याचे वेळीं त्यास रोख देण्यांत येईल, व त्यानें पोस्टाचेअधिकाऱ्यांचे ताब्यांतच त्या ठेविल्या तर पुढील परिच्छेदामध्यें निर्दिष्ट केलेलें जें त्याचें खातें ठेवण्यांत येतें, त्या खातीं त्याचें नांवानें तें जमा करण्यांत येईल.

९ आपल्या प्रॉमिसरी नोटा पोष्टाचे अधिकाऱ्यांचेच ताब्यांत ठेवाव्या, असें अर्जदारानें ठरविलें तर अर्जदाराचे नांवानें एक सेव्हिंग्स बँकखातें ह्याप्रीत्यर्थ सुरू करून पोष्टाचे अधिकारी त्या नोटांचें व्याज दर सहा माहीस वेळच्यावेळीं घेऊन तें अर्जदाराचे खातीं जमा करितील. जेव्हां जेव्हां येणें प्रमाणें व्याज घेण्यांत येईल. तेव्हां तेव्हां ती गोष्ट ही पोष्टाचे अधिकारी त्यास वेळोवेळीं कळवितील. हें काम करण्याबद्दल सरकार अर्जदारापासून कांहीं घेणार नाहीं. आणि हें सहामाही व्याज देतांना त्यावर इन्कमटाक्स ( प्राप्ती वरील कर) कापून घेण्यांत येणार नाहीं.

अर्जदारानें प्रॉमिसरी नोटा आपलेपाशींच ठेविल्या तर सहामाही व्याज देण्याचे वेळीं त्यावर नेहमीं प्रमाणें इन्कमटाक्स कापून घेण्यांत येईल.

### प्रॉमिसरी नोटांची विक्री.

१० वर सांगितलेल्या पद्धतीनें पोष्टामार्फत विकत घेतलेल्या नवीन कर्जाच्या प्रॉमिसरी-नोटा ज्याच्या जवळ असतील अशा सेव्हिंग्स बँकेचे ठेविदाराचे मनांत केव्हां ही असें आलें कीं, त्या किंवा त्यापैकीं कांहीं नोटा विकून टाकाव्या. तर त्याचेसाठीं त्या विकून टाकण्याची ही व्यवस्था पोष्ट आफिस करील. व त्या कामासाठीं दलाली अगर फी कांहीं एक घेणार नाहीं. ह्यासंबंधानें तपशिलवार माहिती पाहिजे असल्यास ती पोष्टआफिसांत केव्हां ही मिळेल.

### अर्जाचा नमुना.

मी ——————————

या अन्वयें अर्ज करितों कीं ता. २८ जुलई सन १९१५ चे गॅझिट आफ इन्डिया, एक्स्ट्रा ऑर्डिनरी मध्यें जाहीर करण्यांत आलेल्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या मुदतबंद कर्जापैकीं —————— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

+ [ बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे ती रक्कम —————— रुपये मी या अर्जाबरोबर दाखल करीत आहे.

---

बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे तितकी रक्कम ह्मणजे —————— रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून ह्या कामासाठीं मला मिळावी अशी मी विनंति करितों.

बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे त्या रकमेच्या अदाई करितां मी —————— रुपये या अर्जाबरोबर दाखल करीत आहे व बाकीची रक्कम —————— रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून मला मिळावी अशी मी विनंति करितों.

---

माझी अशी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलच्या प्रॉमिसरी नोटा अकौंटंट जनरल, पोस्ट ऑफिस व टेलेग्राफ्स्, यांचे जवळ माझेसाठीं ठेवाव्या आणि त्याबद्दलचें व्याज ठरीव मुदतीनीं माझे नांवें सुरू केलेल्या पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेचें खात्यांत माझे नांवें जमा करावें.

---

माझे पासून जितकें कर्ज घेण्याचें मंजूर होईल * त्या रकमेच्या खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रॉमिसरी नोटा मला देण्यांत याव्या.]

नांव ——————————

पत्ता ——————————

तारीख —————————— १९१५

* ( वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा. )

+ [ ] वरील या खुणामधील मजकूरांतील अनवश्यक बाबी खोडून टाकाव्या.

---

**वऱ्हाडसमाचार**

मिति भाद्रपद वद्य ११ शके १८३७

## पारशी आणि हिंदु.

( लेखक—रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. )

थोड्या दिवसांपूर्वीं मि. रतन टाटा यांच्या देणगीनें प्राचीन पाटलीपुत्र नगरीच्या शोधाचा जो उपक्रम झाला त्याचें पहिलें फळ ह्मणून एक विचित्र शोध डा. स्पूनर यांनीं जगापुढें मांडलें आहे. त्यांनीं कांहीं प्रमाणें वगैरे देऊन असें सिद्ध करण्याचा यत्न केला आहे कीं बौद्धकाळांत पर्शिया ऊर्फ इराण देशांतल्या लोकांची छाप हिंदुस्थानच्या इतिहासावर उठली होती, इतकेंच नाहीं, तर गौतम बुद्ध व अशोक यांच्या सारख्या ठळक ऐतिहासिक पुरुषांचा उगम ही शोधल्यास पर्शियांतच सांपडेल. डॉक्टर साहेबांचा मूळ साग्र लेख अद्याप माझे अवलोकनांत आला नाहीं तों पर्यंत त्यांच्या लेखांचें इतरांनीं जें सार काढलें आहे त्यावरून मूळ लेखावर टीका करणें वाजवी होणार नाहीं. तथापि प्रसिद्ध झालेल्या सारांशावरून डा. स्पूनर यांच्या सिद्धान्ताची स्थूल दशा चांगली समजते व ती आतांपर्यंत पाश्चात्य पंडितांच्या शोधांच्या दिशेहून भिन्न नाहीं. भरतखंडाच्या प्राचीन इतिहासांत जो कांहीं चांगला भाग असेल तो मूळचा भारतीयांचा नाहीं, तर भरतवर्षाच्या बाहेरून तो आलेला आहे हें दाखविण्याचा त्यांचा नेहमीं यत्न असतो. भारतीयांना गणित शास्त्र, ज्योतिष, वगैरे शास्त्रांचें ज्ञान नव्हतें तें आरबांनीं त्यांना शिकविलें; त्यांना शिल्पज्ञान नव्हतें तें खाल्डिया, बाबिलोन किंवा गांधार या प्रदेशांतल्या लोकांकडून त्यांना मिळालें; ताजमहाल बांधण्याची अक्कल भारतीय शिल्पकारांची नाहीं, ती इटालियन शिल्पज्ञांनीं त्यांना दिली, भारतीयांमध्यें लेखनकला नव्हती ती अशीच बाहेरून आली; सारांश भारतीय लोक प्राचीन काळीं सुधारणेंत अग्रेसर होते असा जो टेंभा हिंदुलोक मिरवित आहेत तो खोटा आहे असें दाखविण्याचा बऱ्याच पाश्चात्य पंडिताचा यत्न असतो. डा. स्पूनर यांचा यत्न ही याच कोटींतला आहे, आणि इतर पाश्चात्य पंडिताच्या तर्कजालाप्रमाणें तोही भाबड्या लोकांच्या मनांत भ्रम उत्पन्न करणारा आहे हेंच या लेखांत मला दाखवावयाचें आहे.

प्राचीनकाळीं पार्शिया वगैरे देशांतले

लोक हिंदुस्थानांत निरनिराळ्या निमित्तानें येऊन त्यांपैकीं कांहीं इकडे स्थायिकही झाले ही गोष्ट मी खोटी ह्मणत नाहीं. पण त्याच वेळीं किंबहुना त्याच्या ही अगोदर भारतीय लोकांनींही दूरदूरच्या देशांत जाऊन तेथें आपल्या वसाहती केल्या होत्या याला ही अबाधित ऐतिहासिक व भाषाविषयक प्रमाणें आहेत. खुद्द इराणांत हिंदूंच्या वसाहती होत्या, व त्यांचे अवशेष अद्याप तिकडे सापडत आहेत. नीबुर नामक जर्मन पंडित प्रवासी इराणांत शोध करीत असतां त्याला इस्ताखर नामक प्राचीन पारसिक नगरींत भारतीय वर्णमालेंतलीं अक्षरें कोरलेले इमारतींचे कांहीं अवशेष सांपडले. जेमासिद नांवाच्या दुसऱ्या एका पारसिक नगरांत भारतयांचा अधिकार प्रचलित होता या विषयींचीं प्रमाणेंही उपलब्ध झालीं आहेत. भारतीयांनीं तिकडे नवग्रहांची पूजा आपले बरोबर नेली होती. फारशी इतिहासकार मोहसान यानें एका इराणी राजाचें नांव महावाद असें दिलें आहे. हें उघड उघड संस्कृत मूलक दिसतें. या राजाच्या प्रजावर्गांत धार्मिक (ब्राह्मण), सामरिक (क्षत्रिय), व्यवसायी (वैश्य) व दास (शूद्र) असे चतुर्वर्णाचे लोक असल्याबद्दल तो इतिहासकार सांगतो. झेंद भाषा व वेदिक छंदभाषा यांच्यांत विलक्षण साम्य आहे. झेंद भाषेचीं कांहीं अक्षरें ही संस्कृत वर्णमालेशीं जुळतात. तशीं तीं इतर कोणत्याही भाषेशीं जुळत नाहींत. त्या अक्षरमालेचें नांव 'देलवारजिन' असें आहे. कदाचित् देवनागरी या शद्वाचा तो अपभ्रंश असेल. शिकंदर बादशहानें इकडून परत जातांना आपल्या बरोबर कित्येक संस्कृतज्ञ पंडित नेले होते. तो सर्वांना 'कल्याण मस्तु' असें ह्मणून आशीर्वाद देत असे. त्यावरून त्याच्या मूळच्या नांवाचा लोप होऊन कल्याण हेंच त्याचें नांव पडलें व प्लूटार्क यानें जें शिकंदर बादशहाचें चरित्र लिहिलें आहे. त्यांत कल्याण हेंच त्याचें नांव दिलें आहे. या पंडितानें पार्सिपोलिस नगरांत आत्महत्त्या करून घेतल्याचा उल्लेख प्लूटार्क यानें केला आहे. या कल्याण पंडिताविषयींचा उल्लेख स्ट्राबो, आरियन, लुशियान वगैरेंच्या ग्रंथांतही आहे. अनेक प्राचीन इराणी ग्रंथांतून संस्कृत मूलक नांवें आढळतात. आरसेस नांवाचा पार्शियन राजाचें नांव आर्यक असलें पाहिजे. क्यांबिसेस ह्मणजे कांबोजीय, सियाक्सरेस ह्मणजे उवक्षतर, पारिसातिस ह्मणजे पुरु, बागोआत ह्मणजे भागवत, सायरस= सूर्य अशीं साम्यदर्शक उदाहरणें शेकडों देतां येतील. या व इतर प्रमाणांवरून पार्शियांतले लोक हे मूळचे भारतीय असून तिकडे वसाहत करून राहिलेल्यांचे वंशज असावेत असा सिद्धांत भट्ट मोक्षमूलर यांनीं बसविला होता, त्यांत पुष्कळ तथ्य असावेंसें दिसतें. पारशी लोकांचा गाथा ग्रंथ ही तर संस्कृताची हुबेहुब नक्कल दिसते. त्या गाथेंतला एक भाग वहिष्ट यध्र ह्मणजे वसिष्टमंत्र हा आहे. होम (सोम) युष्माकम्, अहुर्मज्द (असुरमेधस्) मिऱ्ह (मित्र), अहिर्मन् (आर्यमन्) इ. शद्ब मूळचे निर्विवाद संस्कृत आहेत. सारांश, त्याकाळीं आमचे भारतीय लोक इराण, अफगाणिस्तान तार्तरी वगैरे देशापर्यंत व त्यांच्याही पलीकडेस जाऊन पोंचले होते व त्यांनीं आपली भाषा, आपले शिल्प, आपला धर्म व सुधारणेचीं इतर अंगें यांचा तिकडे प्रसार केला होता. असें असतां भारतीय सुधारणेचा हा प्रसार दृष्टिआड करून पारशी नमुन्याचें शिल्प किंवा सिंहासन, अथवा भांडीं वगैरे हिंदुस्थानांत सांपडल्याबरोबर भारतीय सुधारणा ही पारसिकांची नक्कल आहे, व गौतमबुद्ध आणि अशोक यांच्यासारख्या आमच्या परमपूज्य ऐतिहासिक व्यक्ति याही अस्सल भारतीय नसून पारसिकांच्या रक्त बीजापासून झालेल्या आहेत असें ह्मणणें हें टाटाशेटसारख्या दानशूर-गृहस्थाच्या मनाला किती ही गुदगुल्या करण्यासारखें असले तरी इतिहासदृष्ट्या या शोधाची किंमत कांहीं नाहीं, उलट इतिहासाचा विपर्यास करणारा डा. स्पूनर यांचा सिद्धांत आहे अतएव तो त्याज्य समजला पाहिजे. पाश्चात्य पंडित डा. स्पूनर यांचा जयजयकार करोत, पण आह्मा भारतीयांना निष्कारण कलंक लावणारा हा शोध आहे, येथेंच मला सांगावयाचें आहे व डा० स्पूनर यांच्या शोधाचा सारांश प्रकट होतांच आपल्या इतिहासाच्या पुस्तकांतून दुरुस्ति करण्याचा उतावळिपणा आमच्या लोकांनीं करूं नये, येवढी माझी देशबांधवांना विनंति आहे. त्यांचा साग्रलेख प्रसिद्ध झाल्यानंतर या संबंधानें अधिक लिहितां येईल. तूर्त येवढा इषारा पुरे आहे.

---

## भारतीय स्वराज्यसंघ.

मिसेस आनी बिझांटबाइ या कांग्रेस पक्षाला मिळाल्या ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. या बाई ज्या कामाला हात घालतील तें अत्यंत उत्साहानें, कळकळीनें व परिश्रमानें पूर्ण केल्यावांचून कधा राहावयाच्या नाहींत असा आजपर्यंतचा अनुभव आहे. त्यांना कांग्रेसपक्षाला येऊन मिळण्याला पुरीं दोन वर्षें झालीं नसतील, पण इतक्यांतच त्यांनीं आपलें नांव हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासांत चिरस्मरणीय करून ठेवण्यासारखीं कृत्यें करण्याचा उपक्रम केला आहे. व कांग्रेसमधली दुफळी मोडण्याचा पहिला जोरदार यत्न मद्रासकांग्रेसचे वेळीं त्यांनीं केला, पण त्यांत यश येण्यासारखें नाहीं, कांग्रेसच्या तत्त्वाचा बळी देऊन समेट घडवून आणणें इष्ट ही नाहीं असें पाहून त्यांनीं तो नाद तूर्त तरी सोडला व आपलें लक्ष समेटाहून अधिक महत्त्वाच्या अशा एका बाबीकडे वळविलें आहे. हिंदुस्थानासाठीं स्वराज्याची मागणी हा कांहीं नवा प्रश्न नाहीं. मि. दादाभाई नवरोजी यांनीं आठ वर्षांपूर्वींच कांग्रेसच्या अध्यक्षपदावरून या विषयाचा उपक्रम केला होता, पण मध्यंतरी अनेक कारणांमुळें या विषयाकडे लक्ष देण्याची अवश्यकता कांग्रेसच्या पुढाऱ्यांस दिसली नाहीं. सध्याच्या युद्धासारख्या प्रसंगीं स्वराज्यासारखे वादग्रस्त प्रश्न उपस्थित करावे कीं नाहीं या विषयीं कांग्रेसच्या पुढाऱ्यांमध्यें मतभेद आहे. पण हिंदुस्थानानें युद्धांत प्राण खर्ची घालण्यापर्यंत जी राजनिष्ठापूर्वक मदत ब्रिटिश साम्राज्याला केली आहे ती लक्षांत घेतां तिचा योग्य मोबदला स्वराज्याचे अधिकार रूपानें मागण्यास सध्यासारखा अनुकूळ काळ पुनः येणार नाहीं असें मिसेस बिझांटबाइस वाटत असल्यामुळें त्यांनीं सर-विल्यम वेडरबर्न व मि. दादाभाई यांच्या सारख्या वृद्ध व अनुभवी गृहस्थांच्या सल्यानें भारतीय स्वराज्यसंघ स्थापण्याची योजना तयार करून तो आपल्या न्यू इंडिया पत्राच्या द्वारें नुकतीच प्रसिद्ध केली आहे. हा संघ ह्मणजे राष्ट्रीयसभेला प्रतिस्पर्धी अशी संस्था नसून तिची सहकारिणी मैत्रीण आहे. कांग्रेसच्या ध्रीडपैकीं पहिले उद्देश विलायतेंत व हिंदुस्थानांत लोकमत जागृत करून साधणें हा या संस्थेचा उद्देश आहे. या संघाचे दोन भाग केले आहेत. पैकीं एक हिंदुस्थानांत लोकमत जागृत करीत राहील, व दुसरा विलायतेंत तेंच काम करील. एकंदर संघाचे अध्यक्ष मि. दादाभाई हे असून भारतीय शाखेचे अध्यक्ष सर एस. सुब्रह्मण्यम् हे राहणार आहेत. विलायतेंतल्या शाखेच्या अध्यक्षाचें काम सर विल्यम वेडरबर्न हे करणार आहेत. वीस वर्षांपूर्वीं असा संघ विलायतेंत स्थापून विलायतेंत हिंदुस्थान विषयक जागृति करण्याचा उत्तमलोकवासी मि. चार्लस ब्राडलॉ यांचा विचार होता, पण त्यांच्या अकाल निधनामुळें तो मनांतल्या मनांत राहून गेला. तो त्यांचा हेतु तडीस नेण्याचें काम मिसेस आनी बिझांटबाईनें उत्साहानें हातीं घेतलेलें पाहून मि. ब्राडला यांच्या आत्म्यास खरोखर मोठें समाधान वाटेल. मिसेस बिझांटबाईनीं मि. ब्राडला यांचीच कार्यपद्धति उचलली आहे. जोराचे, निश्चयाचे, सतत प्रयत्न करणें व त्यांत यश मिळेपर्यंत अविश्रांत श्रमकरणें हें त्यांचें तत्त्व या नव्या संघानें उचलण्याचें ठरविलें आहे. विलायतेंतील लोकमताला निष्कारण न डवचतां किंवा न चिडवितां त्यांच्या उदार मनोवृत्तींना जागृत करून अनुकूळ करून घेण्याचें धोरण आपण राखूं अशी बाईची प्रतिज्ञा आहे. ती सफळ होवो.

---

## युद्ध आणि सांपत्तिक स्थिति.

प्रस्तुतच्या युद्धाचा हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीवर काय परिणाम घडला आहे हा मोठा जटिल प्रश्न आहे. तथापि हिंदुस्थान-सरकारच्या करन्सी (नाण्या संबंधी) खात्याचा जो वार्षिक रिपोर्ट नुकताच बाहेर पडला त्यांतल्या गोष्टीवरून या प्रश्नावर बराचसा प्रकाश पडेल. येदाच्या वर्षीं देशांतल्या नाण्यांचा बराच संकोच झाला. अशी स्थिति हिंदुस्थानला पुष्कळ वर्षांनीं आली आहे. चोहींकडे महागाईची ओरड व नाण्यांचा दुष्काळ अशी ओरड ऐकूं येत असतां गतवर्षीं हिंदुस्थानांत ७ कोटी ४८ लक्ष रुपये किंमतीचें सोनें आलें हें विधान बुचकळ्यांत टाकण्यासारखेंच आहे. पण याचें खरें रहस्य हें आहे कीं हें सगळें सोनें सरकारच्या गंगाजळीच्या वृद्धींत खर्च झालें आहे. चांदी चलनी नोटा व दुसऱ्या शिलकी रकमा यांत नेहमीं पेक्षां बरीच पीछेहाट आहे. नोटांचा खप कमी होण्याचें कारण व्यापाराची मंदी हें उघड दिसत आहे. युद्धाच्या सुरुवातीला लोकांनीं घाबरून पोस्टल सेव्हिंग्ज ब्यांकांतून भराभर पैसे काढून घेतले. या व दुसऱ्या कित्येक कारणांमुळें रुप्याच्या नाण्यांची मागणी वाढली, तरी सरकारला नवीन रुपये पाडावे लागले नाहींत. युद्धाच्या सुरुवातीच्या पूर्वीं हिंदुस्थानांत चलनी नोटांचा व्यवहार जास्त होता, पण युद्धापासून तो कमी झाला आहे. गेल्यावर्षीं बनावट नोटा तयार करण्याच्या युक्तीला आळा बसण्यासाठीं सरकारनें एक नवी युक्ती योजिली. जुनी नोट खाजिन्यांत आली कीं ती रद्द करून तिच्या ऐवजीं नवी नोट देण्याची वहिवाट घालण्यानें बनावट नोटा तेव्हांच ओळखतां येतील. ह्मणून शक्य तितक्या लवकर ही वहिवाट सुरू करण्याचें ठरलें आहे. नोटांचे पैसे जिल्ह्याच्या खाजिन्यांतून देण्याचा प्रघात सुरू केला आहे तो लोकांच्या फार सोयीचा झाला आहे. बनावट नोटा तयार करणाऱ्या एक मंडळीचा पत्ता नुकताच लागला आहे. ही टोळी जावा बेटांत खोट्या नोटी तयार करून इकडे पाठवीत असते. या टोळींपैकीं पांचजण पकडले गेले असून त्यांना कडक शिक्षाही करण्यांत आल्या, वगैरे माहिती सदर रिपोर्टांत दिली आहे.

---

## हिंदुस्थानचे उद्योगधंदे.

सध्या युद्धामुळें जर्मनी व आस्ट्रिया यांचा हिंदुस्थानांतला व्यापार बंद झाला आहे, तरी या गोष्टीचा फायदा हिंदुस्थानच्या पदरांत न पडतां व्यापारी नफ्याचा लोण्याचा गोळा मधल्यामध्यें झडप घालून जपानी घार नेत आहे. या गोष्टीमुळें हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यासंबंधानें विचार करणारांत विचार जागृति उत्पन्न होऊन हा प्रकार बंद पाडण्यासाठीं निरनिराळे लोक निरनिराळ्या युक्त्या सुचवीत आहेत. या सगळ्या सूचना कोणाला एकत्र पाहावयाच्या असतील तर ता० २९ सप्तेंबर रोजीं मुंबई येथें भरलेल्या इंडियन चेंबर ऑफ कामर्सच्या सभेच्या रिपोर्टांत त्या मिळतील. या सभेचे अध्यक्ष ना. मि. मनमोहन रामजी यांनीं असें सुचविलें कीं हिंदुस्थानचे भांडवलवाले व सरकार यांनीं सहकारित्व ठेवल्यानें व ज्याप्रमाणें सरकार रेल्वे कंपन्यांना ठराविक व्याज देण्याची हमी घेतें त्याप्रमाणें उद्योगधंद्यासंबंधांत सरकारनें हमी घ्यावी. दुसऱ्या एका गृहस्थानें सुचविलें कीं हा प्रश्न स्वावलंबनानें सुटेल. देशीमाल टिकाऊ असला ह्मणजे झालें, तो परदेशी मालाइतका सफाईदार नसला तरी चालेल, अशा भावनेनें स्वदेशीचें तत्त्व आचरण्यांत आणणें जरूर आहे. तिसऱ्या एकानें सुचविलें कीं जपानी सरकार ज्या प्रमाणें जपानी कारखान्यांना भांडवलाच्या वगैरे सवलती देऊन मदत करतें त्याप्रमाणें सरकारनें कारखान्यांना द्रव्यसाह्य करावें, व हें होण्यास हिंदुस्थानच्या फडणिशीच्या कारभारांत हिंदी लोकांना स्वातंत्र्य असणें अवश्य आहे. चवथे एक गृहस्थ ह्मणाले कीं शील हा औद्योगिक उन्नतीचा आत्मा आहे. जों पर्यंत तें शील आमच्यांत येणार नाहीं, तों पर्यंत उद्योगधंद्यांत आह्मांला कधीं यश येणार नाहीं. वर ४० वारांचा छाप असून आंत कापड मोजावें तर बरेंच कमी, असा फसवणुकीचा प्रकार चालत आहे तों पर्यंत

गिऱ्हाइकानें कारखानदारांचा विश्वास कसा धरावयाचा ? या सगळ्या सूचना कमी ज्यास्त मानानें खऱ्या आहेत यांत शंका नाहीं. सरकारी पांगुळगाड्यावांचून उद्योग धंदे रूपी लेकराला एकदम पाऊल टाकतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें स्वावलंबनाचें तेज अंगीं बाणल्यावाचून नुसत्या सरकारच्या मदतीनेंही कार्यभाग होणार नाहीं हेंही तितकेंच खरें आहे. शीलाचें महत्त्व कधींही पूर्णपणें सांगतां येणार नाहीं. अशा स्थितींत या सर्व सूचना एकसमयावच्छेदें करून अंमलांत आणिल्या तरच कांहीं कार्यभाग होईल. सरकारला आपल्या कर्तव्याविषयीं थोडी बहुत जागृति होत आहे हें संयुक्त प्रांत व पंजाब सरकारच्या उदाहरणांवरून स्पष्ट होत आहे. पण लोक स्वदेशीव्रतासंबंधानें येवढे शिथिल कां झाले आहेत तें कळत नाहीं. शीलभ्रष्टता हें त्याचें कारण असल्यास सदर प्रश्न आरंभीं दिसतो तितका सोपा नाहीं असें ह्मटलें पाहिजे.

## मॉ. वेनिझेलो

बल्गेरिया व ग्रीस यांनीं आपली तटस्थवृत्ति सोडून प्रस्तुतच्या युद्धांत सामिल होण्याचें पहिलें चिन्ह— सैन्याची हालचाल— दाखविलें आहे अशावेळीं ग्रीस देशचे मुख्य मुत्सद्दी प्रधान मॉ. वेनिझेलो यांच्या चरित्राचें शद्बचित्र वाचकांना खात्रीनें गमतीचें वाटेल. वर्ल्ड नामक एका इंग्रजी पत्रांत हें प्रसिद्ध झालें आहे. त्याचा सारांश असा आहे— मॉ० वेनिझेलो हे अप्रतिम वक्ते आहेत. श्रोतृसमाज किती ही निश्चयाचा असला तरी यांच्या वक्तृत्वाचा प्रभाव त्याच्यावर पडल्याखेरीज राहत नाहीं. ते विलक्षण दृढनिश्चयी आहेत. एकादी गोष्ट करावयाची असा त्यांचा एकदा निश्चय झाला कीं तो कधीं ढळावयाचा नाहीं. तथापि ते अगदीं गोड स्वभावाचे आणि मनामिळाऊ ही आहेत. त्यांचे सभ्यपणाचें वर्तन व गोड स्वभाव हा त्यांच्या निश्चयाच्या आड कधीं येत नाहींत हें त्यांतलेत्यांत एक आश्चर्य आहे. विद्येचा सुसंस्कार हें त्यांच्या चारित्र्याचें मुख्य रहस्य आहे. त्यांना स्वभाषा तर उत्तम येतेच, पण शिवाय फ्रेंच, इटालियन व इंग्रजी या भाषा ते अस्खलित बोलूं शकतात. हे नुसते मुत्सद्दीच नाहींत, तर वाङ्मयाचे भोक्ते व इतिहासाचे मोठे पंडित आहेत. त्यामुळें प्राचीन ग्रीस देशाचें वैभव त्या देशाला पुनः प्राप्त व्हावें ही त्यांची उत्कट इच्छा आहे व ही इच्छा त्यांच्या सर्व कृत्यांत प्रतिबिंबित झालेली दिसते.

## युद्धाची वार्ता.

गेला आठवडा दोस्तराष्ट्रांचें कल्याण चिंतणाऱ्यांना अतिशय आनंददायक गेला. या आठवड्यांत रशियन लोकांनीं लुक् नांवाचें शहर मोठ्या शिकस्तीनें सर केलें, आणखी सहा हजारांवर शत्रु कैद केले. द्विन्सक नदीपाशीं चाललेल्या भयंकर युद्धांत राशियन तोफखान्यानें अद्भुत कर्तृत्वशक्तीनें जर्मनांना दिपवून टाकिलें. आणखी तीन चार ठिकाणीं ही राशियनांनीं असाच अतुल पराक्रम करून जर्मनांची पीछेहाट करून जर्मन शिपायांना कैद केलें. व्हिल्ना पाशीं त्यांनीं मुद्दाम माघार घेऊन आपलें सैन्य एका सरळ रेषेंत आणून सोडलें. ही कामगिरी फार मोठी व फायद्याची झाली. सारांश या आठवड्यांत राशियन जिकडे जिकडे गेले, तिकडे तिकडे विजयश्री त्यांना माळ घालीत होती. पश्चिमेकडील रणक्षेत्रांत ही हीच स्थिति आहे. आज कित्येक आठवडे तिकडे शांतता होती. पण तिचा कंटाळा येऊन कीं काय एकदम जोराचे ब्रिटिश हल्ले सुरू होऊन पांचमैल पर्यंतचे जर्मन खंदक इंग्रजांनीं घेतले, आणि शत्रूची फळी फोडून तींत त्यांनीं प्रवेश केला. तेथेंही १७०० जर्मन शिपाई कैद करण्यांत आले. या शिवाय यांत्रिक तोफा वगैरे युद्धोपयोगी सामान त्यांच्या हातीं लागलें तें निराळेंच. लूस शहर इंग्रजांच्या हातीं लागलें. नऊ तोफा व २६०० जर्मन शिपाई ही कैद केले. फ्रेंचांनीं याच वेळीं आरासच्या उत्तरेसहल्ला करून जर्मन खंदकांत प्रवेश केला व सूचेजची जागा हस्तगत केली. फ्रेंचलोकांनीं या वेळीं मोठा पराक्रम केला. आस्ट्रियन व इटालियन यांच्यामध्यें चकमकी चालूच आहेत व इटालियन लोक शत्रूला मागें हटवीत आहेत दार्दानेल्सकडे शांतता आहे. नाहीं ह्मणावयाला तिकडे फ्रेंच लढाऊ जहाजांनीं किनाऱ्यावरील तुर्की तोफखान्यावर भडिमार करून शत्रूचें पुष्कळ नुकसान केलें.

## लढाईचा हेतु नाहीं.

बलगेरियानें आपलें सैन्य हलविलें, पण तसें करण्यांत दुसऱ्यावर हल्ला करण्याचा हेतु नसून केवळ स्वतःच्या बचावासाठीं तें करण्यांत आलें असें बलगेरियानें अर्धवट सरकारी रीतीनें जाहिर कलें आहे.

याच वेळेस ग्रीसनें ही आपलें सैन्य हलविलें. त्यापूर्वीं ग्रीसचे राजे व प्रधान यांचें खलबत झालें होतें व त्यावेळीं प्रधानानें आपण ही स्वतःच्या बचावासाठीं निरुपाय ह्मणून सैन्य हलविलें असें सांगितलें. ग्रीस प्रसंगीं उपयोगीं पडावी ह्मणून लढाईची तयारी करून राहिलें आहे. लष्करी कायदा जाहिर करण्यांत आला आहे. माल बाहेर जाऊं देण्याची मनाई केली आहे. बोटी व रेल्वे यांन सज्ज ठेवण्याचें काम चाललें आहे, व खर्चाकरितां नॅशनल ब्यांककडून ९६ लक्ष पौंड कर्ज देण्यांत येतील असें ठरलें आहे.

## मि. कीर हार्डी यांचा मृत्यु.

इंग्लंडांतील लेबर पक्षाचे पुढारी—किंबहुना तो पक्ष अस्थित्वांत आणून मजुरांच्या मागण्यांची दाद थेट पार्लमेंटापर्यंत पोंचविण्यास कारण झालेले—मि. कीर हार्डी एम. पी. यांची निधनवार्ता ऐकून गरिबांचा एक जोरदार वाली नाहींसा झाला असे दुःखोद्गार हिंदुस्थानांत सर्वत्रें निघतील. हे यःकश्चित् खाणींत काम करणारे आशिक्षित मजूर होते, पण केवळ पौरुषेय आणि स्वपराक्रम यांच्या बलावर त्यांनीं मुत्सद्दी मंडळींत अग्रस्थान पटकावून मजुरांचा कैवारी हें नामाभिधान संपादलें होतें. यांचे अंगीं थोडासा विक्षिप्तपणा व बराचसा स्वातंत्र्याचा बाणा होता. त्यांच्या निर्भीडपणाच्या व निस्पृहतेच्या भाषणानें व वर्तनानें त्यांनीं लोकांचीं मनें इतकीं आकर्षून घेतलीं होतीं कीं यांना मजूरपक्षाचे अनभिषिक्त राजे असें लोक समजत असत. यांची बुद्धि इतकी कुशाग्र व दृष्टि इतकी भेदक असे कीं दोन महिन्याच्या हिंदुस्थानाच्या प्रवासांत त्यांनीं हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्नाचें मार्मिक ज्ञान करून घेऊन त्यावर एक ग्रंथ लिहिला, व त्या ग्रंथांत त्या राज्य पद्धतींतलीं बिंगें इतक्या निर्भीडपणानें दाखविलीं कीं आंग्लो–इंडियन पत्रकर्ते बोटें चोळीत राहिले. हा त्यांचा निर्भीडपणा त्यांना जिकडे तिकडे शत्रु उत्पन्न करून ठेवण्यास कारण झाला होता. तो इतका कीं त्यांचा मृत्युलेख लिहितांना सुद्धां 'मृतमाणसांविषयीं वाईट साईट लिहूं नये' हें नीतिवाक्य टाइम्स ऑफ इंडियासारखे संपादक विसरले. 'सत्या असत्यासी मन केलें ग्वाही' हें त्यांचें ब्रीदवाक्य होतें. अशीं कर्तृत्ववान् माणसें कोणत्याही राष्ट्रांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतकींच निघावयाचीं. तेव्हां अशा गृहस्थाच्या मृत्युनें त्यांच्याशीं मतभेद असलेल्या पण उदार व थोर मनाच्या माणसांस हळहळ वाटणें स्वाभाविक आहे. मि. कीर हार्डी यांना इहलोकीं जी शांति प्राप्त झाली नाहीं ती त्यांच्या आत्म्यास परलोकीं तरी प्राप्त होवो ह्मणजे झालें.

## ✓ प्रांतिक परिषद.

मध्यप्रांत व वऱ्हाड यांची प्रांतिक परिषद नामदार रावबहादूर मुधोळकर यांच्या मनांतून उमरावतीला भरवावयाची होती, पण प्लेगामुळें त्यांना आपला तो मनोरथ बाजूस ठेवावा लागला. प्लेगामुळें उमरावतीस भरणारी महाराष्ट्र सामाजिक परिषद भरविण्यांत आली नाहीं. आणि तसाच दुसरा प्रसंग हा पुनः आला. १९०७ सालीं ३ री प्रांतिक परिषद रायपुरास भरली होती. त्याच्यानंतर आज आठ वर्षांनीं हा पुन्हा सुयोग येत आहे. पुण्या मुंबईकडे जसे मवाळ व जहाल असे तट पडले आहेत, तितके दुर्भेद्य तट आमच्या प्रांतांतील राजकीय मंडळींत नाहींत ही आनंदाची गोष्ट होय. मुंबई कडील मवाळ जहालापासून इतके अलिप्त राहूं इच्छितात कीं एकाला दुसऱ्याचा वारा ही खपत नाहीं. आणि या अंतस्थ दुर्मनस्कतेमुळें सुरतेच्या कांग्रेसच्या वेळीं घडलेला प्रकार उभयपक्षांस ही लांछनास्पद असाच घडून आला. आणि गेल्या ८ वर्षांच्या अनुभवानें आतां दोन्ही पक्ष शहाणे झाले आहेत असा आमचा समज आहे. दोघांनाही आपआपल्या विचारांतील चुक्या कळून चुकल्या आहेत आणि उभयतांमधील विचार कलह आतां पूर्वीं इतका जाज्वल्य नाहीं; इतकेंच नाहीं तर दोन्ही पक्षाकडील मंडळी आतां समेट करण्याला एकजीव होत चालले आहेत. गेल्या ८ वर्षांत जी क्रांती घडून आली आणि परस्परांच्या विचाराचें संघर्षण होऊन पेटलेला अग्नी आतां राष्ट्रकार्य करण्याइतका मंदाग्नी झालेला आहे. राजकीय कुरुक्षेत्रांत ही शिकून आलेली कार्यक्षमता आतां विशेष लाभप्रद होईल असा रंग दिसतो. दोघा पक्षांनीं परस्परांमधील कल्याणदृष्टी स्वीकृत केली आहे. आणि परस्परांमधील सद्गुणाचा व तेजाचा भाग गुणज्ञपणानें आपलासा केला आहे. तेव्हां पुढील महिन्याच्या मोहरमच्या सणांत नागपुरास भरणारी प्रांतिक परिषद विशेष श्रेयस्कर होईल. आणि पुण्यास भरलेल्या दोन विरोधी प्रांतिक परिषदांप्रमाणें आमच्या प्रांतीं रंगें माजणार नाहींत असा आह्मांस मोठा भरंवसा वाटतो. काल रोजीं नागपुरास या प्रांतिक परिषदेची तयारी करण्याकरितां स्वागत कमिटी नेमण्यासंबंधानें पहिली जाहिरसभा भरणार होती. तेव्हां हें मवाळ–जहाल पक्षांचे संयुक्त राष्ट्रकार्य चांगलें सिद्धीस जावो अशी आह्मी आशा करतों.

## गुणानुवाद.

### (राजश्री टिळक यांची आचार्य कोटींत गणना)

गेल्या 'चित्रमय जगता'च्या अंकांत रा. रा. दादासाहेब खापर्डे यांनीं **गीतारहस्या** संबंधानें एक सुंदर अग्रलेख लिहून त्या महाग्रंथाचा रसास्वाद सहृदयपणानें जगापुढें मांडला आहे. राजश्री दादासाहेब खापर्डे हे ग्रंथकर्त्या इतकेच बहुश्रुत, विवादपटु व मर्मज्ञ आहेत. आणि त्या शिवाय त्यांच्या लेखाला अंतःकरणांतील स्नेहभावानें विलक्षण सौंदर्य व चारुता आली असून गीतारहस्यांतील तत्ववादाची खुलावट फार उत्कृष्ट साधली आहे. **कालिदास** कवीचें सर्वांग सुंदर हृदय उकलून मांडणारी जशी एक मल्लीनाथी टीका तद्वत् किंबहुना त्याहून उच्च कोटीचा हा गीतारहस्यावरील लेख अधिक वर्णनीय आहे. तो सर्वांनीं अवश्यमूलांत वाचावा अशी आह्मी शिफारस करतों. भक्तिज्ञानप्रधान कर्म योगाची मीमांसा न्यायशास्त्रांतील घटपटादिकांच्या खटाटोपाइतकीच मनोरंजक खरी, पण जनसमूहाला ती सुखबोध नाहीं. गीतारहस्यामध्यें ज्या अकर्मवादाचें व उदासीन वैराग्याचें खंडण केलें आहे, आणि भक्तिप्रेरित व ज्ञानोज्वल कर्ममार्गाचें मंडण केलें आहे तो वाद इंग्लिश राजकवी टेनिसन यांनीं आपल्या Holy Grail या काव्यांत फारच हृदयंगम रीतीनें सांगितलेला आहे. गृहदारादिकांचा त्याग करावा, जगांतील आपला आयुष्याचा क्रम सोडून एखाद्या मठांत जाऊन संन्यास दीक्षा घ्यावी व तेथें परमोज्वल आत्मविद्येचा अभ्यास करावा इ० इ० मार्ग कांहीं अलौकिक व्यक्ती खेरीज इतर जनांस ते दुःसाध्य व अश्रेयस्कर होतें. **टेनिसन** ह्मणतात कीं अशा विचारांच्या वृत्तीनें समाज विस्कळित होतात, मानव चरित्राचें स्वारस्य जातें, आणि अशीं संकटें व अडचणी या मार्गांत उभीं आहेत कीं तेथें बहुतेक मनुष्य फसून दुःखाधीन होतो. आणि अशा संन्यास दीक्षेला मनाच्या अपक्व स्थितींत लागलेले लोक आपल्या काल्पनीक स्वर्गाला तर पोंचत नाहींतच, पण त्यांच्या हातून उलट बाजूला इतका अतिरेक होतो कीं ते तोतये वेदांती समजाला विघातक होतात. टेनिसनच्या आर्थरचें चरित्र हेंच गीतारहस्याचें सुंदर उदाहरण होय. सर्व आयुष्याचा क्रम ह्मणजे या ऐहिक पृथ्वीचा त्याग नव्हे. प्रत्येकाचें आयुष्य आपापल्या जीवनक्रमानें व कार्यबाहुल्यानें

इतकें सुंदर बनलें पाहिजे कीं खरा स्वर्ग कायतो येथेंच आहे अशी मनोमय खात्री पटली पाहिजे. अखेरीस गीतारहस्याच्या ग्रंथानें सर्व महाराष्ट्रास पूज्य झालेले आचार्य श्री बाळगंगाधर टिळक यांचें पुन्हां अभिनंदन करितों असें ह्मणण्यापेक्षां त्यांनीं आपल्या प्रस्तुत ग्रंथानें जी मोठी चळवळीची लाट पसरून दिली आहे. तिच्या बुडाशीं असलेल्या राष्ट्रीय अभ्युदयाची आह्मी प्रशस्ती सांगत आहों असें ह्मटलें तरी चालेल.

## मोठें डोकें.

आमच्या एका मित्राला लहानपणीं असा मोठा नाद असे कीं त्यानें मोठमोठ्या लोकांच्या तसबिरी फार कुशाग्रतेनें अवलोकन कराव्या, आणि त्यांच्या आकृती वरून त्याच्या अवलोकनांतील तसबिरींतला जोतो मनुष्य कसा काय मोठा आहे याचें त्यानें प्रतिपादन करावें. अर्थातच अशा विचारामध्यें मनाचे पूर्वग्रह अनेक दोष उत्पन्न करितात. पण त्याच्या त्या विवादाच्या धोरणाप्रमाणेंच आजपर्यंतच्या शास्त्रज्ञाच्या अनुभवाचा रोख दिसतो. मोठे मोठे विचारी लोक होऊन गेले, तेव्हां त्यांच्या मरणानंतर त्यांच्या मेंदूची चीरफाड करून मेंदूच्या आकृती व वजन हीं टिपून ठेवण्यांत आलेलीं आहेत. विचार करणारा जो मनोदेह त्याचे स्थूल देहांतील बाह्यद्वार ह्मणजे मेंदू होय. पण अलीकडील प्रोफेसर **कार्ल पिअरसन** यांनीं असा शोध काढला आहे कीं या अंतस्थ मनोभूमीमध्यें व बाह्य मेंदूमध्यें फार थोडा संबंध आढळून येतो. ह्मणजे एक लघु तर दुसरा लघु किंवा एक गुरु तर दुसरा गुरु असा कांहीं त्यांच्यामध्यें परस्पर संबंध आढळून येत नाहीं. **फ्रान्स बोआस** हे एक अमेरिकन प्रोफेसर आहेत. आणि त्यांचाही या शरीर शास्त्रासंबंधानें असाच सिद्धांत प्रसिद्ध झालेला आहे. फ्रेंच शास्त्रज्ञ **मॅन्यु व्हेरिअर** यांनीं तर ३५ प्रख्यात श्रेष्ठ पुरुषांचे मेंदू मापून पाहिले. आणि त्यांचा आकार सरासरीनें प्रत्येकीं १६६५ घन सेंटिमीटर होता. सामान्य माणसांच्या मेंदूपेक्षां हा आकडा १०५ घन सेंटिमीटरनीं अधीक आढळून आला. पण त्यानें ४५ खुनी माणसांचे मेंदू तपासून पाहिले. तेव्हां तेही सामान्य प्रतीच्या आकारापेक्षां २० घन सेंटिमीटरनीं अधिक भरले. या वरील चर्चेवरून मेंदूचें वजन किंवा आकार हा जसा मोठा तसा तो अधिक तैलबुद्धीचा व श्रेष्ठ वर्गांतला आहे असे सांप्रतचे शास्त्रीय शोध कांहीं सांगत नाहींत. तेव्हां या दोन प्रमाणांशिवाय आणखी कोणकोणतीं प्रमाणें लक्षांत घेतलीं पाहिजेत ह्मणजे मनोदेहाचा श्रेष्ठपणा बाह्यमेंदूवरून पडताळून पहाण्याची प्रक्रिया विशेष बिनचूक होईल, हा शोध अजून लागावयाचा आहे.

## शुभशकुन.

### ( स्वराज्याविषयीं उदार विचार. )

इंडियाला ब्रिटिश साम्राज्याखालीं स्वराज्य मिळण्याचीं प्रसादचिन्हें दिसत आहेत. नामदार शफी यांनीं विलायतेस भरणाऱ्या साम्राज्याच्या परिषदेला इंडियाच्या वतीनें सभासद असावा अशी सूचना कायदे-कौंसिलांत मांडली तेव्हां लार्ड हार्डींज ह्मणाले कीं दृष्टीचा कोन इतका विस्तृत होत चालला आहे कीं मुख्य प्रधानांच्या विचाराप्रमाणें इंडियाला साम्राज्याच्या इतर भागासारखेच समसमानतेचे हक्क देण्यांत येईल. या ठरावाला कानडा आदिकरून कांहीं वसाहतींनीं आपल्या मंगल अक्षतांनीं मोठी पुष्टी दिली आहे.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—हस्तनक्षत्राची हत्तीसारखी धार पीकावर अमृतच वर्षत आहे. या पावसानें प्रेगादि रोगांचीं मूळकारणें विलयास जाऊन लोक भावी धनधान्यसमृद्धीची आनंदानें वाट पाहूं लागतील. हा पाऊस गुजराथेकडील भागांतही दुष्काळाच्या आपदा थोड्याबहुत दूर करीत आहे ही आनंदाची गोष्ट होय.

**प्रेग**—या रोगाचा प्रसार क्रमाक्रमानें, व एक सारखा सार्वत्रिक सर्व शहरभर झाला आहे. शहराबाहेर लोक निरनिराळ्या छावण्या करून राहिले तेथेंही या रोगाचे मृत्यु होत आहेत. या मुळें लोक हवालदील विशेष आहेत. गेल्या १८ आगष्ट पासून आक्टोबर १ ले तारखे अखेर एकंदर ५९९ लोक लागले व त्यापैकीं ५०४ मरण पावले. हे आंकडेच मृत्युदरवारची मोठी क्रांती सांगत आहेत. गेल्या सप्तकाचे आंकडे येणें प्रमाणें.

| ता. | प्रेगानें लागले. | मेले. |
|---|---|---|
| २४ सप्तेंबर | १४ | १५ |
| २५ " | २५ | २७ |
| २६ " | २९ | २८ |
| २७ " | २६ | २४ |
| २८ " | २३ | २५ |
| २९ " | १७ | १७ |
| ३० " | २५ | २० |
| १ आक्टोबर | २२ | २२ |
| २ " | २१ | १३ |

या शिवाय इतर मृत्यु कधीं १, २, किंवा ४ असे होत असतात.

**अभिनंदनः**—पोलिस खात्याच्या गेल्यासालच्या वार्षिक रिपोर्टांत वऱ्हाडांतील ज्या अधिकाऱ्यांचा मुद्दाम उल्लेख करण्यांत आला आहे, त्यांचा नामनिर्देश खालील प्रमाणें.

| रा. रा. | हुद्दा. |
|---|---|
| बुक मिअसे, उमरावती | कप्तानसाहेब |
| मॅकनील, बुल्ढाणा | " |
| गेअर, आकोला | " |
| चिर्थम, यवतमाळ | " |
| जॉन्स्टन, खामगांव | असिस्टंट सुपरिंटेंडन्ट |
| स्कॉट, वाशीम | " |
| हॉक शॉ, बुल्ढाणा | रिझर्व इन्स्पेक्टर |
| अबदुल्गफूर, आकोला | सर्कल इन्स्पेक्टर |

याशिवाय हल्लींचे कप्तानसाहेब राजश्री ऑर्चर्ड हे रिपोर्टाच्या वेळीं रायपूर जिल्ह्याला होते ह्मणून त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा उल्लेख तिकडील कारकिर्दीच्या धोरणानें करण्यांत आलेला आहे.

## जाहिरनोटीस.

विद्यमान सीनिअर सबजज्ज साहेब आकोला, यांचे कोर्टांत.

अर्जदार

सिताराम गुरु भगवानदास बैरागी रा० श्री खोलेश्वर संस्थान आकोलें हे श्री खोलेश्वर संस्थान आकोला तर्फे वहिवाटदार व मालक.

या नोटिशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें भयत नैनसुखदास बल्देवदास रा० आकोला याचे लोकांकडून घेणें असलेल्या रकमाची वसूल करण्याकरितां सक्सेशन सार्टिफिकेट मिळण्या बद्दल कि. अर्ज नंबर १२ सन १९१५ चा कोर्टांत तारीख ४-८-१९१५ रोजीं दाखल केला आहे. या अर्जाची सुनावणीची तारीख ९-१०-१५ नेमली आहे. तरी या संबंधानें कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्यानें स्वतः अगर वकीला मार्फत आपला लेखी जबाब वरील तारखेस या कोर्टांत दाखल करावा. त्या प्रमाणें न केल्यास अर्जदार यास वरील तारखेस सार्टिफिकीट दिलें जाईल व मग पुढें यासंबधानें कोणाची कांहीं तक्रार ऐकिली जाणार नाहीं.

Sd/ D. K, Kolatker.
सीनीअर सबजज आकोला.

नो. नं ३७०

## जाहीर नोटीस.

मी संतोबा वल्द पारोबा हटकर राहणार मौजे गादेगांव तालुका मंगरुळपीर जि० आकोला.

यांजकडूनः—

गणेशप्रसाद वल्द देवीप्रसाद परदेशी ब्राह्मण राहणार मौजे गादेगांव हल्लीं मुक्काम कारली तालुका मंगरुळपीर जि० आकोला.

यांसः—

नोटीस देतो अशी कीं तुजला मी तारीख १४-९-१९१५ इसवी रोजीं जनरल पांच रुपयाचे कागदावर कुलमुखत्यारपत्र लिहून दिलें आहे. हल्लीं तुझी वर्तणूक कोणतेच प्रकारची बरोबर न दिसल्यावरून शिवाय तुझा विश्वास नसल्यावरून तुजला यां नोटीसीनें जाहीर करितो कीं आज तारखेपासून तूं माझे बद्दल कोणतेही कोर्टांत किंवा देवघेव किंवा माझेबद्दल रजिष्ट्रर दस्तऐवज केल्यास मी मुळींच जबाबदार नाहीं. ते सर्व रद्द समजले जाईल. या नोटीसीचे आधारें तुझें कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे कळावें. तारीख २६-९-१९१५ इसवी.

सही
संतोबा पारोबा रा० गादेगांव द. खु.

नो० नं० ३७१

## जाहिर नोटीस

आकोला को ऑपरेटिव्ह पायोनियर्स कंपनी लिमिटेडचे सर्व मेंबर लोकांस या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं ३९ मेंबरांचा एक व आणखी निराळे ४ मेंबरांचा एक असे दोन अर्ज डायरेक्टराकडेस आले आहेत कीं कंपनीचा सर्व हिशेब तपासला जाऊन कंपनी मोडून टाकावी व त्या करितां कंपनीची एक्स्ट्रा ऑर्डिनरी जनरल सभा भरवावी व डायरेक्टरांसही तसेंच वाटतें. ह्मणून खालील स्पेशल ठराव पास करण्याकरितां ता. २०-१०-१९१५ रोजी बुधवारीं दुपारी ४ वाजतां रा. माधव गोपाळ शीरसाळकर वकील यांचे जठारपेठेंतील घरीं सभा भरणार आहे तरी सर्व त्रांनीं हजर रहावें. कळावें. ता. १-१०-१५ इ.

ठराव

कंपनीचें काम चालत नाहीं. व कांहीं एक होऊं शकत नाहीं. तरी कंपनी मोडली जावी.

सही.
रामधन जमनादास
हरी नारायण पंडित
डायरेक्टर्स आकोला.

नो. नं ३७२

## नोटीस

नोटिस बेशर्मा वहाबखां वा बिसमिल्लाखां मुसल्मान रा० नांदुरा ता. मलकापूर

यांसः—

मी खालीं सही करणार नोटिस देतो कीं तुह्मास भाऊबंदीचे मांडणा करितां जें कुलमुखत्यारपत्र पांच रुपयाचे कागदावर नोंदून दिलें आहे. तें या नोटिशीअन्वयें रद्द केलें आहे. हें रद्द केलेलें मुखत्यारपत्र नोटिस पावतांच परत करावें. सदरहू मुखत्यारपत्रावरून माझे तर्फे तुह्मी कोणतेच काम यापुढें करूं नये. केल्यास त्याची जबाबदारि तुमचेवर आहे. व त्याबद्दल योग्य कोर्टा मार्फत तजवीज केली जाईल. क. ता. २०-९-१५

सही
फौजखां वा॥ अजमखां अ० पा. क.
अई संदलबी मर्द शेखचांद रा.
नांदूरा जि० आंगठा खुद
नो० नं० ३७३

## जाहीर नोटीस

मी संतोबा वा॥ पारोबा हटकर राहणार मौजे गादेगांव प्रगणे गिरोली तालुका मंगरूळपीर जि० आकोला

यांजकडून

नोटिस देण्यांत येते कीं मी मौजे गादेगांव येथील गणेशप्रसाद वा॥ देवीप्रसाद परदेशी ब्राह्मण याजला जनरल पांच रुपयाचे स्टांपावर कुलमुखत्यारपत्र ता. १४-९ १९१५ इसवी रोजीं लिहून नोंदून दिले होते. तरी या नोटिशीनें जाहिर करतो कीं सदरहु कुलमुखत्यार हा विश्वासू नसून कोणते वेळेस काय नुकसानी करील. किंवा देवघेव किंवा माझे नांवानी कोणताही रजिष्टर दस्तैवज करील. किंवा कोणत्याही कोर्टांत माझे तर्फे काम करील याचा नेम नाहीं. तरी मी आज तारखेपासून त्याचे कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे. यापुढें कोणतेंही काम करील तर तें रद्द समजलें जाईल. या नोटिशीनें जाहिर करतो दिली सही ता. २६-९-१९१५ इ.

सही
संतोबा पारोबा रा. गादेगांव द. खु.
नो० नं० ३७४

## जाहीर नोटीस

पुंनाजी वल्लद विठोबा गायकवाड कुणबी रा० कासूर जाहगीरदाराची ता० बाळापर पेठ बाळापूर यांस:—

नुरी मर्द पुंनाजी उमर वर्षे १९ पंधरा अज्ञान पालन करणार जन्म देती आई निंबाबाई मर्द यादोबा अडनांव इखे रा० हिंगणघोट ता० खामगांव पो० जळम इजकडून या जाहिर नोटीसीनें कळविण्यांत येते कीं, तुझी माझी मुलगी अजमास २।३ वर्षाची होती तेव्हां माझा मेव्हणा नामे मारुती वल्लद तुळसींग याच्या मदतीनें लग्न तुमच्याशीं करून दिले लग्न झाल्यानंतर माझा मेव्हणा वाट मोकळी करण्यास तुमच्या गांवीं आला त्या वेळेस तुह्मी लग्नाच्या वेळेस आंगावर घातलेले दागीने काढून घेऊन वाट मोकळी करण्यास मुलगी रवाना केली, तेव्हांपासून आजपावेतों तुह्मी मुलीस नेले नाहीं. या गोष्टीस सर्व पंच मंडळी साक्षीदार आहेत. या गोष्टीस केवळ १२ वर्षांवर काळ होऊन गेला, आतां कायद्याप्रमाणें तुह्मांस मुलीचे अन्नवस्त्र आह्मांस मागतां येत नसून तुमचा तिजवर कायद्यानें नवरेपणाचा हक्क ही राहीला नाहीं फक्त मी त्या मुलीचा दुसरा घरठाव झाल्यावर तुह्मी जिवंत नवऱ्याचा पाट लावला ह्मणून फौजदारींत फिर्याद कराल ती तुमची कायद्यानें चालू नये ह्मणून तुह्मास ही जाहिर नोटीस दिली आहे तुह्मांस कळविण्यांत येते कीं या बाबतींत तुह्मांस कांहीं पंच वगैरे जमा करून निकाल करणें असल्यास आह्मांस या नोटीशीचा जबाब ८ दिवसाचे आंत द्यावा. तुह्मांस वाटल्यास तुह्मी त्या नोटीशींत पंच जमा करून निकाल करण्याची तारीख दिवस गांव कळवावे ह्मणजे आह्मी त्यागांवीं त्या तारखेस पंच चिठ्या पाठवून बोलावून घेऊं. ही नोटीस दिली सही ता. २९ माहे सप्टेंबर १९१५ मुक्काम आकोला पेठेंत तहशील कचेरीनजीक सही

नूरी मर्द पुनाजी अज्ञान पालन करणार आई निंबाबाई मर्द यादोबा इखे इची नि. खु. बांगडी

नो० नं० ३६८

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना.

## ए. जे. ख्यात्रे आणि सन सुगंधी.

ठि:--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदिर भुलेश्वर - मुंबई.

एकच भाव! ओटो सुरंगीं! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो सुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्यांशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, विझिक, इसापिंकें, हस्तिदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार. मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण करून असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटे मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. गुटिका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची लाली, संकोच, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुंगधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं,

पत्ता:—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

नो० नं० ३६९

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4 823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,42 ) |
| 1894 | 4259,,607 | 94,49,9718 |
| 1904 | 43,64,808- | 2,47,18.89 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,86,509 |

### BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitntes sa recort for the company. The next Division of profits will be made at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after provioing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0:

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

Regd-No. N150

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख ११ माहे आक्टोबरें सन १९१५ ई० [ अंक ४०



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊ व घेण्याची वहिवाट आहे.



### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नो. नं २



### अस्सल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर ॥।≈ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो० नं० ८



### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १०८.



**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.



# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ४



### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १० रु आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ याचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३



## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल



### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भत्त्याचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर



### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा- मोड, गुलाबाचींफुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साधीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर बाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो. नं १९३



# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ति ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरण शास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, मरण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मोरिझम प्रयोगविधि वगैरे अनक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेववें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको किंमत १ रुपया ट. ख. ३ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ३६४

# आठ आण्यांत लूट

( खालील सर्व बुकें फक्त आठ आण्यास मिळतील )

१ कोकविद्या — सचित्र व समग्र कोकशास्त्र.
२ रसायनविद्या — सोनें चांदी व भावण्याची युक्ति
३ मंत्रविद्या — मंत्रसिद्धीच्या योगानें सर्व रोग बरे करणें.
४ मृतात्मीं संभाषण करण्याची युक्ती.
५ गानविद्या — गायनसंबंधीं शिकण्याची विद्या.
वशीकरण — विद्या.
पत्ता — स्पष्ट व बालबोधींत लिहावा.
प्रयाग नारायण अग्रवाल अलीगड सिटी.


## नोटीस

रा. रा. तुळशीराम सूर्यभान तिडके दुकान सांगवी ता. मुर्तिजापूर.

यांस:—

मी खालीं सही करणार नोटीस देतो कीं आह्मी तिघे सख्खे भाऊ असून तिघांची इस्टेट एकत्र आहे. पैकीं वडील भाऊ नामें राजाराम वा हनवती रा. दुर्गवाडा ता. मुर्तिजापूर हा भ्रमिष्ट झालेला आहे व अशा स्थितींत तुह्मी त्याचे पासून कांहीं भ्रष्ट मार्गानें त्यास कांहीं एक न देतां गहाणखत रुपये २०० दोनशेचे ता. २८–९–१५ रोजीं करून घेतलें व नोंदूनही घेतलें. हें तुमचे करणें लबाडीचें असून अन्यायाचें आहे. तुह्मी वरील भ्रमिष्ट गृहस्थाबरोबर व्यवहार करून आमची ही इस्टेट गहाण घेतली आहे. तरी नोटिस पावतांच तें गहाणखत रद्द करून आमचे हवाली करणें. आह्मांस तें कबूल नाहीं व त्याबद्दल आमच्या भ्रमिष्ट भावांनीं त्यांत लिहून दिलेलीं जिनगी जबाबदार होणार नाहीं. आह्मांस त्यांनी पैसे दिले नाहींत व वरील राजाराम आमचेंत असून त्यास कर्ज काढण्याचें कारण नाहीं, शिवाय वरील गहाणखतांतील पोटहिस्सा नंबर हा चुकला आहे त्यावरून आपली लबाडी दृष्टोत्पत्तीस येते. नोटीस पावतांच या संबंधीं स्पष्ट खुलासा करावा व गहाणखत आह्मांस रद्द केलेलें परत द्यावें. नाहीं पेक्षां योग्य कोर्टांत तजवीज करावी लागेल ता. ९–१०–१९

सही निशाणी आंगठा

१ काशीराम वा। हनवती गाडगे रा. दुर्गवाडा याचा खुद्द.
२ शिवराम वा। हनवती गाडगे रा. दुर्गवाडा याचे बा। आंगठा वरील काशीरामचा.

नो० नं ३७९

## हिंदुस्थान सरकाराकडून काढण्यांत येणारें मुदतबंद कर्ज.

पोष्ट आफिसा मार्फत कर्ज द्यावयाचें असल्यास तें कोणत्या अटीवर देतां येतें या संबंधीं नोटीस.

या सालीं सरकार निराळ्या स्वरूपाचें कर्ज काढीत आहे, व त्यावर शेंकडा ४ टक्के व्याज देण्यांत येईल. ह्या कर्जाची पूर्ण फेड फार उशिरां ह्मणजे सन १९२३ चे नोव्हेंबर महिन्यांत करण्यांत येईल. परंतु सन १९२० चे आक्टोबर महिन्या नंतर केव्हांही तें फेडून टाकण्याचा हक्क सरकारनें आपले स्वाधीन ठेविला आहे.

२ कलकत्ता, मद्रास, मुंबई व इतर मोठमोठीं शहरें येथून अर्ज येऊन मामुली पद्धती प्रमाणें ४॥ कोटींचें कर्ज आधींच जमा झालें आहे; आणि ह्या रकमेपुरतें तरी कर्ज घेणें आतां बंद करण्यांत आलें आहे. परंतु लहान रकमांनीं कर्ज देण्याची ज्यांची इच्छा असेल मग ते सेव्हिंग्स बँकांमध्यें ठेवी ठेवणारे असोत वा नसोत, अशा इसमांना सेव्हिंग्स बँकेचें कामकरणाऱ्या अगदीं नजीकच्या पोष्ट आफिसाचे मार्फत कर्ज देण्यासाठीं आणखी एक खास संधी देण्यांत येत आहे.

### कर्ज कसें द्यावें

३ ता० ३१ आक्टोबर पर्यंत केव्हांही पोस्ट आफिसाचे मार्फत अर्ज पाठवितां येतील.

४ अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांहून कमी नाहीं व शंभरांनीं बरोबर भाग तुटेल इतक्या रकमेसाठीं द्यावा. तथापि कोणाही एकाच अर्जदारास ५००० हून जास्त रकमेकरितां केव्हांही अर्ज करितां येणार नाहीं.

टीपः— शेंकडा ३॥ टक्के व्याजाच्या कर्जाच्या प्रॉमिसरी नोटा जरी पूर्वींच कोणी पोस्ट आफिसामार्फत विकत घेतलेल्या असल्या तरी त्याला ह्या नवीन कर्जापैकीं ५००० रुपयांपर्यंत कर्ज देण्यासाठीं अर्ज करितां येतो.

५ ज्याला अर्ज करण्याची इच्छा असेल त्यानें पुढें दिलेला अर्जाचा नमुना भरावा. सेव्हिंग्स बँकेचें काम करणाऱ्या कोणच्याही पोष्ट आफिसांत हा नमुना मिळेल. पण अर्जाबरोबरच जितकें कर्ज देण्यासाठीं तो अर्ज असेल तितकी रक्कम अर्जदारानें भरली पाहिजे. अर्जदाराची जर सेव्हिंग्स बँकमध्यें ठेव असली तर त्या ठेवीचा ही या कामाकरितां त्यास उपयोग करितां येईल, किंवा स्वतंत्र रोख रकम देतां येईल अर्जदारानें पोस्ट आफिसांत स्वतः जावें किंवा दुसऱ्या कोणास पाठवावें. दिलेल्या प्रत्येक रकमेबद्दल पावती देण्यांत येईल.

६ अर्जदार जितकी रकम देईल त्या सर्व रकमेइतक्या त्याला शंभर शंभर रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा देण्यांत येतील.

### प्रॉमिसरी नोटा कोणी ठेवाव्यात.

७ ह्या नोटा अर्जदारानें आपल्या स्वतः पाशींच ठेवाव्यात. अगर मर्जीस वाटल्यास आपल्यातर्फे त्या पोस्टाचे अधिकाऱ्यांजवळच राहूं द्याव्यात. कोणची पद्धति आपणास पसंत आहे हें अर्जाचा नमुना भरतांना त्यानें नमूद करावें. नोटा आपल्या जवळच ठेवण्याची त्याची इच्छा असली तर त्या त्याचे हवालीं करण्याकरितां तयार होऊन आल्या ह्मणजे पोस्ट आफिस त्याला तसें कळवील. आणि तो त्या घेण्याकरितां स्वतः हजर झाला ह्मणजे त्या त्यास देण्यांत येतील. त्या नोटा पोस्ट आफिसांतच राहूं देण्याचें त्यानें ठरविलें तर त्याला पुन्हां पोस्ट आफिसांत जाण्याचें कारण नाहीं त्या नोटा आपणाकडे आल्या आहेत, व अर्जदाराकरितां त्या ठेवण्यांत आल्या आहेत, असें पोस्ट आफिस अर्जदाराला योग्यवेळीं कळवील. पुढें कधीं जर ह्या नोटा आपले पाशींच ठेवाव्या अशी त्याची इच्छा झाली तर पोस्टाचे अधिकारी त्या त्याचे स्वाधीन करितील.

### व्याजाची अदाई

८ शेंकडा ४ टक्यांप्रमाणें व्याज वर्षांतून दोन वेळां ह्मणजे शेंकडा २ टक्के मे महिन्याचे ३१ वे तारखेस व २ टक्के नोव्हेंबरचे ३० वे तारखेस दरसाल देण्यांत येईल. कर्ज दिल्याचे तारखेपासून तों येत्या नोव्हेंबरचे ३० वे तारखे पर्यंतच्या तुटक मुदतीसाठीं जें व्याज होईल तें, अर्जदार नोटा आपल्यापाशींच ठेवील तर, त्या नोटा त्याचे स्वाधीन करण्याचे वेळीं त्यास रोख देण्यांत येईल, व त्यानें पोस्टाचेअधिकाऱ्यांचे ताब्यांतच त्या ठेविल्या तर पुढील परिच्छेदामध्यें निर्दिष्ट केलेलें जें त्याचें खातें ठेवण्यांत येतें, त्या खातीं त्याचें नांवानें तें जमा करण्यांत येईल.

९ आपल्या प्रॉमिसरी नोटा पोष्टाचे अधिकाऱ्यांचेच ताब्यांत ठेवाव्या, असें अर्जदारानें ठरविलें तर अर्जदाराचे नांवानें एक सेव्हिंग्स बँकखातें ह्याप्रीत्यर्थ सुरू करून पोष्टाचे अधिकारी त्या नोटांचें व्याज दर सहा माहीस वेळच्यावेळीं घेऊन तें अर्जदाराचे खातीं जमा करितील. जेव्हां जेव्हां येणें प्रमाणें व्याज घेण्यांत येईल. तेव्हां तेव्हां ती गोष्ट ही पोष्टाचे अधिकारी त्यास वेळोवेळीं कळवितील. हें काम करण्याबद्दल सरकार अर्जदारापासून कांहीं घेणार नाहीं. आणि हें सहामाही व्याज देतांना त्यावर इन्कमटाक्स ( प्राप्ती वरील कर) कापून घेण्यांत येणार नाहीं.

अर्जदारानें प्रॉमिसरी नोटा आपलेपाशींच ठेविल्या तर सहामाही व्याज देण्याचे वेळीं त्यावर नेहमीं प्रमाणें इनकमटाक्स कापून घेण्यांत येईल.

### प्रॉमिसरी नोटांची विक्री.

१० वर सांगितलेल्या पद्धतीनें पोष्टामार्फत विकत घेतलेल्या नवीन कर्जाच्या प्रॉमिसरी नोटा ज्याच्या जवळ असतील अशा सेव्हिंग्स बँकेचे ठेविदाराचे मनांत केव्हां ही असें आलें कीं, त्या किंवा त्यापैकीं कांहीं नोटा विकून टाकाव्या, तर त्याचेसाठीं त्या विकून टाकण्याची ही व्यवस्था पोष्ट आफिस करील. व त्या कामासाठीं दलाली अगर फी कांहीं एक घेणार नाहीं. ह्यासंबंधानें तपशीलवार माहिती पाहिजे असल्यास ती पोष्टआफिसांत केव्हां ही मिळेल.

### अर्जाचा नमुना.

मी ________ या अन्वयें अर्ज करितों कीं ता. ३८ जुलई सन १९१५ चे गॅझिट आफ इन्डिया, एक्स्ट्रा ऑर्डिनरी मध्यें जाहीर करण्यांत आलेल्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या मुदतबंद कर्जापैकीं ________ रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

+ [ बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे ती रकम ________ रुपये मी या अर्जाबरोबर दाखल करीत आहे.

बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे तितकी रकम ह्मणजे ________ रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून ह्या कामासाठीं मला मिळावी अशी मी विनंति करितों.

बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे त्या रकमेच्या अदाई करितां मी ________ रुपये या अर्जाबरोबर दाखल करीत आहे व बाकीची रकम ________ रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून मला मिळावी अशी मी विनंति करितों.

माझी अशी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलच्या प्रॉमिसरी नोटा अकौंटंट जनरल, पोस्ट ऑफिस व टेलेग्राफ्स्, यांचे जवळ माझेसाठीं ठेवाव्या आणि त्याबद्दलचें व्याज ठरीव मुदतींनीं माझे नांवें सुरू केलेल्या पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेचें खात्यांत माझे नांवें जमा करावें.

माझे पासून जितकें कर्ज घेण्याचें मंजूर होईल * त्या रकमेच्या खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रॉमिसरी नोटा मला देण्यांत याव्या.]

नांव ________

पत्ता ________

तारीख ________ १९१५

* ( वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा. )

+ [ ] वरील या खुणामधील मजकूरांतील अनवश्यक बाबी खोडून टाकाव्या.


वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन शुद्ध ३ शके १८३७


## विकृत इतिहास.

एका फ्रेंच राजाविषयींची गोष्ट हर्बर्ट स्पेन्सर साहेबांनीं आपल्या शेवटच्या 'फ्याक्टस् अँड कॉमेंट्स्' नामक ग्रंथांत दिली आहे. ती अशी कीं त्या राजाला एकदां इतिहासविषयीं एका पुस्तकाचें कारण पडलें तेव्हां त्यानें आपल्या ग्रंथालयावरील अधिकाऱ्याला ह्मटलें. 'जा, आणि त्या लबाडाला घेऊन ये; इतिहास आणि लबाडी या शद्बांचें साहचर्य कानाला कसेंसेंच लागतें. कारण, इतिहास ह्मटला ह्मणजे तो सत्यमयच असला पाहिजे. कोणत्याही काळीं घडलेल्या गोष्टीचें यथातथ्य वर्णन करणें ही तर इतिहासाची प्रतिज्ञा. पण ही प्रतिज्ञा न पाळणारे इतिहासलेखक ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीसारख्या महाविद्यापीठांतून सुद्धां जेव्हां आढळतात, तेव्हां वर निर्दिष्ट केलेल्या फ्रेंच राजाच्या गोष्टीची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसनें अलीकडे 'ब्रिटिश साम्राज्याचें सिंहावलोकन' नांवाची एक ग्रंथमाला प्रसिद्ध केली आहे. या मालेंत ब्रिटिशराजमुकुटांतल्या

देदीप्यमान हिऱ्याच्या–अर्थात् हिंदुस्थानाच्या वर्णनपर एक स्वतंत्र ग्रंथ आहे. येवढ्या मोठ्या लौकिकवान् विद्यापीठाकडून प्रसिद्ध होणारा इतिहासग्रंथ अर्थात्च 'दुराग्रहमूलक किंवा अज्ञानजन्य असत्य विधानांनीं खचून भरला असेल अशी कल्पना तरी कशी व्हावी? अशी कल्पना असंभाव्य वाटते खरी, पण या युगांत असंभाव्य गोष्टी सुद्धां प्रत्यक्ष घडलेल्या दिसतात. त्यांतच या ग्रंथाची गणना करण्याचा शोचनीय प्रसंग हिंदुस्थानच्या दुर्दैवानें प्राप्त झाला आहे.

पंनास वर्षांपूर्वीं ज्यावेळीं इकडे इंग्रजी शिक्षणाला नुकती सुरुवात होऊन इतिहास हा विषय इकडच्या पाठशाळांच्या अभ्यासक्रमांत ठेवण्यांत आला, तेव्हां अनेक इंग्रज लेखकांनीं विद्यार्थ्यांसाठीं हिंदुस्थानचे इतिहास लिहिले. त्यावेळीं हिंदुस्थानच्या इतिहासाचीं साधनें हल्लींच्यासारखीं उपलब्ध नसल्यामुळें गतकाळीं होऊन गेलेल्या ऐतिहासिक पुरुषांविषयीं व त्यांच्या कृत्यांविषयीं लेखकांनीं भलभलत्या समजुती करून घेऊन सत्यान्वेषण न करतां घाईघाईनें तीं पुस्तकें लिहिलीं होतीं. त्यामुळें त्या पुस्तकांतून श्री शिवाजी महाराजांना चोर व लुटारू अशा शेलक्या पदव्यांचा आहेर करण्यांत आला. इतर ही अनेक ऐतिहासिक व्यक्तींना हा अपमान मुकाट्यानें सहन करावा लागला. पण सुदैवानें जसजशी ज्यास्त माहिती उपलब्ध होत गेली, तसतसा दुराग्रहाचा पडदा पातळ पातळ होत जाऊन त्यांतून सत्याचे प्रकाशकिरण बाहेर येत गेले व त्यांनीं त्या दुराग्रहाच्या पडद्याचा भेसुर कृष्णवर्ण जसजसा लोकांच्या निदर्शनास आणिला, तसतशी या जुन्या पुराण्या इतिहास पुस्तकांतलीं असत्य विधानें अविश्वसनीय ठरत गेलीं, व आतां शिवाजीला चोर किंवा लुटारू ह्मणण्याचें धाडस खोटें बोलण्यास निर्ढावलेल्या थोड्याशा व्यक्तींखेरीज इतरांच्यानें सहसा करवणार नाहीं अशी स्थिति प्राप्त झाली आहे. गत गोष्टींच्या संबधानें आणि तेंही सत्यान्वेषणाच्या साधनांच्या अभावीं केवळ अनुमानानें केलेलीं विधानें या प्रमाणें खपलीं ही गोष्ट निराळी; पण सध्याच्या विसाव्या शतकांत हिंदुस्थानच्या विद्यमान स्थितीसंबधानें यथातथ्य माहिती मिळविण्याचीं साधनें विपुल असतांना जर कोणी पांढऱ्यास काळें ह्मणण्याचें धार्ष्ट्य करील, तर तें अक्षम्य मानलें पाहिजे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं असलीं अक्षम्य असत्य विधानें आक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या विद्यमानें प्रसिद्ध झालेल्या हिंदुस्थानाविषयक ग्रंथांत भरपूर आहेत. याचें प्रत्यंतर पाहावयाचें असेल तर या ग्रंथांतलें 'पाश्चात्यविद्येचा परिणाम' येवढें एकच प्रकरण पहा. हे प्रकरण सर रिचर्ड टेंपल नांवाच्या एका विद्वान् लेखकानें लिहिलें असल्यामुळें व हे गृहस्थ हिंदुस्थानांत एका मोठ्या हुद्यावर होते ही गोष्ट लक्षांत घेतली असतां हीं विधानें केवळ अज्ञानमूलक असतील असें ह्मणतां येत नाहीं, तर अज्ञानापेक्षां दुराग्रहच त्यांच्या मुळाशीं असण्याचा ज्यास्त संभव दिसतो.. कांहीं विधानें अज्ञानमूलक ही आहेत. उदाहरणार्थ–प्रार्थना समाज या नुसत्या नांवावरून सुद्धां त्या समाजाचा मूळ उद्देश स्पष्ट होत असतां त्या समाजाला पृच्छकांचा समाज असें टेंपल साहेब ह्मणतात. दुसरें उदाहरण परलोकवासी ना. गोखले यांनीं हिंदुस्थानांत शिक्षण मुफ्त ठेवावें अशाविषयीं सरकारचें मन वळविण्याचा येवढा अट्टाहास केला असतांही त्यांना त्या कामीं यश आलें नाहीं ही गोष्ट जगजाहिर असतां टेंपल साहेब 'हिंदुस्थानांत बहुतेक शिक्षण मुफ्तच आहे' असं ठासून सांगतात! हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीसंबंधाचें येवढें अज्ञान त्या देशाचा इतिहास लिहिण्यास प्रवृत्त होणाराचे ठायीं तरी निदान अक्षम्य ह्मटलें पाहिजे. हीं अज्ञानमूलक विधानांची एक दोन उदाहरणें झालीं. पण टेंपल साहेबांची दुराग्रह मूलक विधानें याहून ज्यास्त धार्ष्ट्याची व वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान असणारास तिटकारा आणणारीं आहेत. सर रिचर्ड टेंपल यांना सुशिक्षित हिंदी लोकांविषयींच्या द्वेषरूपी रोगानें ह्मणा किंवा भूतानें ह्मणा पूर्णपणें पछाडलेलें दिसतें. एरवीं त्यांनीं सुशिक्षित हिंदी लोकांचें 'राजनिष्ठ' व 'अराजनिष्ठ' असे दोन वर्ग करून दुसऱ्या वर्गांत राष्ट्रीय सभेला घालण्याची अक्षम्य चूक केली नसती. ज्या सभेच्या डेप्युटेशनचें स्वागत खुद्द बादशहा पंचमजॉर्ज यांच्या हिंदुस्थानांतल्या प्रतिनिधीनें–व्हाइसराय साहेबांनीं–केलें, व ज्या संस्थेच्या चिटणीसाची सल्ला मसलत लार्ड मॉर्ले सारखे अधिकारी घेण्यास चुकले नाहींत, त्या संस्थेला अराजनिष्ठ ह्मणण्याचें धाडस करणारास मूर्ख, निर्लज्ज, किंवा मतलबी यांपैकींच एखादें विशषण शोभतें. पण टेंपल साहेबासारख्या लेखनपटूला तें लावणें आमच्या जिवावर येतें.

टेंपलसाहेबांच्या मतें राष्ट्रीय सभा राजनिष्ठ नाहीं. तर मग हिंदुस्थानांत राजनिष्ठ आहेत तरी कोण? असा प्रश्न त्यांना उलट विचारण्याची बुद्धि साहजिकच होते. या प्रश्नाचें उत्तर ते देतात कीं हिंदुस्थानांतले संस्थानिक व पारशी. संस्थानिकांना राजनिष्ठ ह्मणण्याचें कारण टेंपल साहेब असें देतात कीं त्यांना इंग्रजी शिक्षण मिळालें असतें, ते विलायतच्या यात्रा करतात व विलायती फ्याशननें राहतात; आणि शिवाय त्यांच्या हिताहिताचीं सगळीं सूत्रें इंग्रज सरकारच्या हातांत आहेत. आमचे संस्थानिक तरी राजनिष्ठ या संज्ञेस वरील कारणास्तव पात्र झाले या बद्दल हिंदुस्थानच्या लोकांना त्यांचा हेवा वाटणार नाहीं. पण खुद्द संस्थानिकांना तरी राजनिष्ठेची ही मीमांसा कितपत रुचेल कोणजाणे! कारण हिताहिताच्या शेवटच्या कारणांत ते मतलबामुळें राजनिष्ठ आहेत असा ध्वनि स्पष्ट आहे. विलायतच्या यात्रा करणें व विलायती फ्याशननें राहणें हीं जर राजनिष्ठेचीं लक्षणें असतील तर राजद्रोहाच्या खटल्यांत अपराधी ठरवून अंदमान बेटास पाठविलेल्या कित्येक कैद्यांना परत बोलावून त्यांच्याविषयीं झालेल्या अन्यायाचें परिमार्जन करण्याचा अनवस्थाप्रसंगही हिंदुस्थान सरकारवर ओढवेल याचा ही विचार टेंपल साहेबांना शिवला नाहींसें दिसतें. स्वतःचे आचारविचार, पोषाखाच्या चाली, भाषा, स्वाभिमान वगैरेचा त्याग करून परकीय आचारविचारांचा आदरपूर्वक स्वीकार करणें हा टेंपल साहेबांच्या मतें 'राजनिष्ठा' शब्दाचा खरा अर्थ दिसतो; आणि कदाचित् याच कारणामुळें त्यांनीं पारशांना राजनिष्ठांच्या यादींत घातलें असावें. कारण, पारशी लोक हिंदुस्थानांत आज दीड हजार वर्षे असून ही त्यांनीं आपला परकेपणा अद्याप सोडला नाहीं, असें साहेब बहादुर मोठ्या आढ्यतेनें सांगत आहेत! आणि मुसलमान लोकांनीं पारशासारखें तुटकपणानें न राहतां हिंदुस्थान हीच आपली जन्मभूमि मानली, या पातकामुळें साहेब बहादुरांनीं त्यांच्यावर ही अराजनिष्ठेचा छाप मारला असावा. एरव्हीं ना. आगाखान, व सर अमीर अल्ली यांच्या सारख्या गृहस्थांना अराजनिष्ठ ह्मणवून घेण्याची पाळी खास आली नसती.

असलीं बाष्कळ विधानें केलेल्या ग्रंथाला इतिहास व तीं करणाराला इतिहासकार तरी ह्मणतां येईल कीं नाहीं हा खरोखर प्रश्नच आहे. हर्बर्ट स्पेन्सर साहेब जर आज विद्यमान असते तर त्यांनीं 'विकृत इतिहासा' वरील आपल्या निबंधांत या ग्रंथांतलीं भरपूर अवतरणें घेतलीं असतीं व या लेखाचे प्रारंभीं निर्दिष्ट केलेला फ्रेंच राजा जिवंत असता, तर त्याला इतिहासकाराला सामान्यतः लबाड अशी संज्ञा दिल्याबद्दल पश्चात्ताप ही झाला नसता. कारण आक्सफर्ड युनिव्हर्सिटीसारख्या लौकीकवान् विद्यापीठानें प्रकाशित केलेल्या इतिहासग्रंथाचें अंतरंग जर इतकें काळेंकुट्ट आहे तर इतर लुंग्यासुंग्या प्रकाशकांनीं केवळ द्रव्यप्राप्तीच्या लोभानें प्रकाशित केलेल्या ग्रंथाची काय स्थिति असेल याची चांगली कल्पना त्याला करतां आली असती. अशा इतिहासकाराचें व त्याला उत्तेजन देणाऱ्या आक्सफर्ड युनिव्हर्सिटीचें कर्णोत्पाटन करून त्याला वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान करून देण्याचें सामर्थ्य एकट्या ब्रिटिशसाम्राज्याधिष्ठित न्यायदेवतेच्याच ठायीं आहे, आणि ती झोपीं गेली नसल्यास तिच्या हातून हें कार्य लवकर घडावयास पाहिजे.

---

## स्त्रीशिक्षण.

### ( मराठा ज्ञातींतील कांहीं विवाहा संबंधानें निघालेले उद्गार )

मराठा ज्ञातींतील ३ स्त्रियां कॉलेजांतील उच्च शिक्षण संपादून समाजाला भूषण झाल्या. पण त्या गायकवाड, निकम व जाधव अशा ३ प्रसिद्ध घराण्यांतील असून त्यांनीं ब्रह्मो, ब्राह्मण व परभू ज्ञातींतील गृहस्थांशीं विवाह केलें. हें पाहून दिग्रस तालुका काटोल येथील देशमूख रा. रा. नीळकंठराव भाऊसाहेब खळतकर यांनीं आपल्या ज्ञातिबांधवांस प्रश्न केला आहे कीं या उदाहरणाकडे डोळे झांक करावी किंवा मराठा क्षत्रीय कुलांचा अभिमान जागृत राहील व धर्मबंधनें सदृढ राहून मराठा कुलोत्पन्न संतती निपजत जाईल अशा धोरणाकडे समाजानें आपली दृष्टी वळवून सांप्रतच्या शिक्षणपद्धती पासून उत्पन्न होणारे दोष त्वरित दूर करण्याची योजना करावी. या प्रश्नाचा उलगडा करण्याकरितां त्यांनीं एक मोठा लेख आमच्याकडे पाठविला आहे. हे गृहस्थ स्त्रीशिक्षणाचे पुढारी आहेत. पण त्यांना इंग्रजी शिक्षणाचे हे विवाह पाहून इतका पश्चात्ताप झाला आहे कीं साधारण प्रतीचे शिक्षण अगोदर मराठा ज्ञातींनीं वाढवून आपला समाज उच्च पायरीला नेऊन पोंचवावा आणि मग इंग्रजी उच्च शिक्षण देण्याचा मोठा उद्योग हातीं घ्यावा असा त्यांच्या विस्तृत लिहिण्याचा रोख आहे. मराठा समाजांत उपवर मुली व मुलगे सुशिक्षित मिळूं लागतील, त्या मानानें वर नमूद केलेले गर्ह्य विवाह आपोआपच नाहींसे होतील. त्यांचा सर्वच लेख कळकळीचा आहे आणि युरोपांतील मताभिलाषी स्त्रियां पाहून मराठा जातींतील अबला यंत्र प्रबला होते कीं काय अशीही त्यांस भीती वाटत आहे. त्यांच्या मनामध्यें जो काहूर उसळला आहे, त्याचाच कांहीं दोष विद्या संपदेकडे नसून त्यांनीं निवडून काढलेलीं उदाहरणें इतर समाजांतही आढळतील. आणि विद्याविभूषितांच्या बाजूनें पाहतांना ते दिग्रसकरांस असा प्रश्न करितील कीं सामान्य जनसमुहाच्या मर्यादा त्यांनीं कां धरून ठेवाव्या. विद्येच्या विमानांत बसून उच्च वातावरणांत फिरणाऱ्या लोकांस हे ज्ञातीचे भेदाभेद तरी कां आवडावेत.

---

## सहकारित्व.

### ( इंडियांतील सहकारी संस्था. )

इंडियांतील सहकारी संस्था संबंधानें गेल्या आक्टोबरच्या ८ व्या तारखेला एक आठ थोर गृहस्थांची कमिटी नेमून त्यांच्याकडून एक रिपोर्ट मागविण्यांत आला होता. हिंदुस्थान सरकारच्या या प्रयत्नाचें पहिलें फळ ह्मणजे त्या कमिटीचा नुकताच प्रसिद्ध झालेला रिपोर्ट होय. या कमिटीचे प्रेसिडेंट सर इ. डी. मॅकलॅगेन हिंदुस्थान सरकारचे माजी सेक्रेटरी हे असून एकंदर रिपोर्ट पुस्तकाच्या रूपानें प्रसिद्ध झाला आहे. सरासरी एक वर्षाचा काल या रिपोर्टाला लागला पण रिपोर्टांतील विचारांची मांडणी फार सुगम असून या महत्वाच्या विषयाचें विवेचन यथायोग्य झालें आहे; यामुळें कमिटीची ही सत्कृती सर्वोपयोगी होऊन पुढील कार्याची मार्गदर्शिकाही होईल. या विवेचनाच्या आरंभीं उपोद्घाताच्या रूपानें सर्व विचारांचा व माहितीचा एक सुंदर लेख आरंभीं असून शेवटीं उपसंहारादाखल एक संक्षिप्त गोषवाराही अखेरीला जोडण्यांत आलेला आहे. या रिपोर्टांतील विचार मराठी वेशांत बहुजन समाजापुढें मांडण्याचा आह्मी विचार केलेला आहे. ह्मणजे त्यावरून प्रस्तुतच्या नव्या मनूचें राजकीय धोरणही लोकांच्या लक्षांत येईल.

#### प्रस्तावना

या कमिटीची नेमणूक झाली (८–१०–१९१४) तेव्हां सहकारी संस्था हिंदुस्थानामध्यें जवळ जवळ दहा वर्षांपेक्षां थोडा अधिक काल प्रचलित झालेल्या होत्या.

सहकारी संस्थेचे उद्देश पुष्कळदां नीटसे कळलेले नसतात. ह्मणून प्रारंभींच आह्मी त्यांचा उल्लेख करितों. गरीब गरीब वर्गांतील लोकांची निकृष्टावस्था दूर करण्याचा उपाय ह्मणून हिंदुस्थानांत सहकारी संस्था मुख्यतः प्रचलित करण्यांत आली व या

गरीब वर्गांमध्यें शेतकरी लोक विशेष करून येतात. आणि हे लोकच एकंदर लोकसमुहाचा मोठा भाग होत. पुष्कळशा युरोपिअन देशांतल्या प्रमाणें हिंदुस्थानांतील पुष्कळ भागांत असें आढळून आलें आहे कीं व्यापाराची मोठी अभिवृद्धी झाली आणि दळण वळणाच्या सोई पुष्कळ निघाल्या तथापि शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति जशी नीटनेटकी व्हावयाला पाहिजे तशी ती सुधरत नाहीं. तसेच शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा कमी होण्याच्या ऐवजीं तो एकसारखा वाढतच चालला आहे. व्याजबट्ट्याच्या धंद्याला अद्याप अधिकाधिक तेजीच येत आहे. शेतकऱ्यांच्या कृषिकर्माच्या पद्धतींत सुधारणा बिल्कुल होत नाहीं. आणि मागसलेल्या शेतकरी वर्गाची स्थिती पूर्वी इतकीच असमाधानकारक असून ती तशीच चालू राहणार. व तिचा प्रतिकारच होण्यासारखा नाहीं कीं काय असा मनांत विकल्प येतो. एका बाजूला व्याज बट्ट्याचा धंदा करणारे सावकार लोकः यांना व्याजाची मोठी हांव व शेती गिळंकृत करण्याची तृष्णा ही मोठी आणि दुसऱ्या बाजूला शेतकरी वर्ग जें कांहीं कमावतो ती सर्व पैदास तो एक गाडून तरी ठेवतो किंवा उधळेपणानें खर्चून तरी टाकितो. त्यामुळें पीकपाणी वाईट झालें तर त्याची अगदीं गाळण उडते. आणि व्यापारी लोकांबरोबर तोलाला तोल देऊन त्याला नीटपणें व्यापारही करतां येत नाहीं. अशा या दोन गोष्टी सांप्रतच्या स्थितींत अगदीं वरवर पहाणाराच्याही लक्षांत येतील. शेतकरी लोकांच्या या नीचावस्थेमध्यें आणखी एक विशेष दिसून पडणारी गोष्ट ह्मणजे विद्येची किंवा सांपत्तिक स्थिती सुधारण्याची त्यांना काडीमात्र गोडी नाहीं आणि त्यामुळें संपत्तीनें व सामाजिक उन्नत स्थितीनें जे लोक उच्चवर्गांत मोडतात, त्यांच्या कडून होणारी पादाक्रांती हा शेतकरीवर्ग निमूटपणें समाधानीनें चालू देतो. ही परंपरागत मनोवृत्ती जुनी अनुरीती आहे, असा तिचा मोठेपणा सांगतात; पण जाणुनबुजून ही जुनी सद् रीती कायम ठेवण्याचा यांत कांहीं प्रयत्न नाहीं. पण त्याला खरें कारण ह्मणजे शेतकरी लोकांची अज्ञानावस्था, पिढ्यानपिढ्या चालत आलेली त्यांची दास्यवृत्ती ही असून भावी कालांतही त्यांच्या डोळ्यांपुढें कांहीं उच्च ध्येय नाहीं असा उलटा प्रकार आहे. तेव्हां या निकृष्टावस्थेचा प्रतिकार करण्यासाठीं ह्मणून सहकारी संस्था काढण्यांत आली आहे. आणि तिचे शिरोभूत तत्व हें कीं सांपत्तिक दुर्दशा सुधरली जावी; इतकेंच नाहींतर समाजांतील गरीबवर्ग जो पुष्कळ कालापासून या नैतिक अधोगतीला लागला आहे तिचा ही प्रतिरोध सहकारी संस्थेनें करण्यांत यावयाचा आहे.

२ देशांतील पुष्कळशा भागांमधील शेतकरी वर्गाची ही हीन अवस्था सरकारच्या लक्षांत येऊन पुष्कळ वर्षें झालीं आणि त्यांची सांपत्तिक स्थिती सुधारण्यासाठीं नानाविध उपायही योजण्यांत आले आहेत. सरकारांतून कर्ज देण्याची कांहीं व्यवस्था चालू केली, पोष्ट ऑफीसांमधून सेव्हिंग ब्यांका काढल्या, कर्जासंबंधानें दिवाणी कायद्यांत वारंवार व मोठमोठे फेरफार केले, कुळाच्या वहितीच्या हक्का संबंधानें, जमिनीच्या क्रय विक्रयाच्या मालकी संबंधानें, कर्जातून एकदम मुक्त करण्यासंबंधानें, व्याजाच्या दराला आळा घालण्यासंबंधानें, वेळोवेळीं निरनिराळ्या भागांतून विशेष कायदे लागू करण्यांत आले. परंतु या उपायांपैकीं कांहीं उपायांनीं जरी पुष्कळसा शेतकरी वर्गाचा लाभ झाला आहे तरी अशा या सर्व उपायांचा सामान्य परिणाम कायतो अंशतः व अपुरा झालेला आहे. या गरीब वर्गाची बौद्धिक स्थिती व सभोंवतालची परिस्थिती सुधारण्यासाठीं जे आरोग्यवृद्धीचे व विद्यावृद्धीचे उपाय योजण्यांत आले तेही अधिक यशस्वी झाले नाहींत. तेव्हां पूर्वी चालू केलेले उपाय सोडून न देतां सरकारनें हा सहकारित्वाचा उपाय अंगीकारिला आहे. आणि सरकारपुढें जो हा मोठा बिकट प्रश्न आहे तो सोडविण्याला सहकारित्वाचा मार्ग विशेष आशाजनक दिसतो. या सहकारित्वाची थोडक्यांत मुख्य कल्पना अशी कीं मनुष्य एकेकटा व्यक्तिशः असमर्थ असतो. तेव्हां तोच दुसऱ्याशीं मिलाफानें वागून आपल्या नैतिक उन्नतीनें व परस्परांच्या अवलंबनानें श्रीमान किंवा कर्तव्यवान् माणसांना जे कांहीं सांपत्तिक फायदे अनुकूळ असतील ते तो आपापल्या परीनें मिळवूं शकतो. आणि अशा पद्धतीनें तो स्वतःची उन्नती इतकी करून घेतो कीं त्याच्या स्वाभाविक कार्यशक्ती पूर्ण विकासाला पावतात.

अपूर्ण

## प्रचंड हानि.

प्रस्तुतच्या युद्धांत कोणत्या राष्ट्राची किती हानि झाली हें नक्की सांगणें कठीण आहे. ही हानि दोन प्रकारची आहे. प्रत्यक्ष हानि व अप्रत्यक्ष हानि. पहिलींत सैनिकांच्या प्राणहानीचा व द्रव्य हानीचा अंतर्भाव होतो, व दुसरींत व्यापाराच्या बंदीमुळें होणारें नुकसान, मनाचें अस्वास्थ्य वगैरे येतात. पैकीं दुसऱ्या प्रकाराच्या हानीला कांहीं मोजमाप नसल्यामुळें ती आंकड्यांनीं दाखवितां येत नाहीं. पहिली आंकड्यांनीं दाखवितां येते, पण हे आंकडे युद्धांत गुंतलेल्या दोन पक्षांपैकीं एक पक्ष नेहमीं दुसऱ्या पक्षाची हानि मोठी झाली आहे असें दाखविण्यास झटत असतो. अशावेळीं तिऱ्हाईत राष्ट्रांतल्या एखाद्या शास्त्रज्ञानें प्रत्यक्ष हानीचा केलेला अंदाज तात्पुरता तरी खरा धरून चालणें अपरिहार्य असतें. ह्मणून न्यूयार्क इंडिपेंट नामक अमेरिकनपत्रांत सरकारी कागदपत्र व रेडक्रास सोसायटी सारख्या परोपकारी संस्थांच्या दप्तरांतलीं अंदाजपत्रकें यावरून तयार केलेला हानीचा तक्ता प्रस्तुत युद्धासंबंधानें प्रसिद्ध झाला आहे तो विश्वसनीय समजून त्यावरून पुढील माहिती देत आहों. ही माहिती कालांतरानें चुकीची ठरण्याचा संभव आहे. तथापि इतर विश्वसनीय साधनांच्या अभावीं हेच आंकडे तूर्त प्रमाण मानून चालूं. या आंकड्याप्रमाणें प्रस्तुत युद्धांत गेल्या महिन्यापर्यंत रशियाचे ८ लक्ष लोक मारले गेले, २० लक्ष कैद किंवा जखमी झाले, ८ लक्ष बेपत्ता झाले. फ्रान्सचे ४॥ लक्ष मारले गेले, ८ लक्ष जखमी, २ लक्ष बेपत्ता झाले. ग्रेटब्रिटनचे १। लक्ष मारले, २॥ लक्ष कैद व जखमी आणि ९० हजार कैद व बेपत्ता मिळून. बेलज्यमचे ५० हजार मारले, १६५००० जखमी ४५ हजार कैद व बेपत्ता; सर्वियाचे ६५ हजार मारले, ११३००० जखमी, ५० हजार कैद व बेपत्ता. मांटीनीग्रोचे ८ हजार मारले, १५ हजार जखमी, व ५ हजार कैद व बेपत्ता, आणि इटलीचे ५ हजार मारले गेले, १२ हजार जखमी व २ हजार कैद व बेपत्ता आहेत. ही दोस्त राष्ट्रांची हानि झाली. आतां जर्मनी व त्याचे साथीदार यांचे आंकडे घेऊं. जर्मनीचे ५ लक्ष मारले गेलें, ३३॥ लक्ष जखमी झालें, १३ लक्ष कैद, व बेपत्ता; झाले. आस्ट्रियाचे ३॥ लक्ष मारले, ८ लक्ष जखमी २ लक्ष कैद व बेपत्ता आणि तुर्कस्थानचे ५० हजार मारले गेले, १ लक्ष जखमी. व ५० हजार कैद व बेपत्ता, दोन्ही पक्षांच्या हानीची बेरीज केली तर एकंदर २४ लक्ष मारले गेले, ५१॥ लक्ष जखमी झाले, व १८ लक्ष कैद व बेपत्ता. झाले असें निघतें. मनुष्यजातीच्या या संहाराकडे पाहून कोणाच्या आंगावर शहारे येणार नाहींत ?

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—गेल्या आठवड्यांत हस्त नक्षत्राचा पाऊस पडून या आठवड्यांत बरीच उघाड आहे. दुपारीं ऊन कडक पडत असून सकाळीं थंडी पडते. पिकांच्या स्थितीकडे पाहतां आतांपर्यंत पडलेला पाऊस योग्य वेळीं व हवा तितकाच पडला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एकंदर पाऊस २६.२५ इंच झाला.

प्लेग—गेल्या ४–५ दिवसांच्या रिपोर्टी वरून पाहतां असें दिसून येते कीं प्लेग ताजनापेठेंत वाढत असून शहरांत कमी होत आहे. आतां पर्यंत २४ तासांत जास्तीत जास्ती आंकडा पेठ व शहर मिळून ४० होता. एका दूषित भागांतून दुसऱ्या भागांत रहावयास जाण्यास म्युनिसिपाल्टिीनें प्रतिबंध केला असून सुद्धां सिविलस्टेशन सारखे भाग दूषित झाले आहेत. आतांपर्यंत ६७१ लोक बळी घेऊन प्लेगची तृप्ति झाली नाहीं किंवा लवकर होईल असा रंग दिसत नाहीं.

## वर्तमानसार.

गेल्या सालांत हिंदुस्थानांत ६४६ माणसें वाघांनीं खाल्लीं; अस्वलांनीं ९५ मारलीं; लांडग्यांनीं १३७, व जंगली हत्तींनीं ५७ मारलीं. सर्पदंशामुळें २२८९४ मृत्यु झाले.

रेशमी किड्यापासून हल्लींच्या दसपट रेशीम काढण्याची युक्ति एका जपानी गृहस्थानें काढली आहे.

हत्यारें बाळगण्याचे परवाने दिवसेंदिवस जास्त प्रमाणांत द्यावे अशी लोकांची मागणी आहे. पण सरकार उलट तें प्रमाण कमी करीत चाललें आहे. सन १९१३ सालीं १८२४१२ परवाने दिले होते; पण गतवर्षी त्यांची संख्या १७६७७९ होती.

भोपाल येथें एक औद्योगिक शिक्षणसंस्था नुकतीच स्थापन झाली आहे.

इंदूर येथील धाकट्या महाराणी साहेब श्री. सौ. इंदिराराजा होळकर यांस ता. ४ रोजीं कन्यारत्न झालें.

मध्यप्रांत व वऱ्हाड यांची प्रांतिक परिषद संयुक्त भरण्याचें ठरलें.

नवीन होणाऱ्या हिंदुयुनिव्हर्सिटींत शीख, जैन यांनांही त्यांच्या त्यांच्या धर्माचें शिक्षण देण्याचें ठरलें आहे.

मद्रासचे माजी विद्याखात्याचे डायरेक्टर सर आलफ्रेड बोर्न यांना टाटा रिसर्च युनिव्हर्सिटीचे डायरेक्टर नेमिलें आहे. हे २५ वर्षांपूर्वी एकदां जीवनशास्त्राचे प्रोफेसर होते ! आणि शिकवावे लागणार रसायन शास्त्र. या पेक्षां डा० पृथ्वीशचंद्र राय यांच्यासारख्या हुषार, रसायनशास्त्रांत नवेनवे शोध केलेल्या एखाद्या गृहस्थाची त्याजागीं नेमणूक झाली असती तर किती चांगलें झालें असतें !

ह्मैसूर संस्थानानें नव्या बजेटांत शिक्षणा प्रीत्यर्थ होणारा खर्च एक लाखानें वाढविला आहे.

इंदुरास संस्थानामार्फत लोकांना भिन्न भिन्न विषयांचें शिक्षण देण्यासाठीं एक साप्ताहिक मराठीहिंदी वर्तमानपत्र येत्या दसऱ्यापासून निघूं लागणार अशा बातम्या आहेत.

THE HINDU SANATORIUM FOR TUBERCULOSIS AT KARLA.

The above Sanatorium which was closed on account of monsoon has now been opened. Persons desiring admission into the sanatorium are requested to apply to Rao Bahadur Soonderdas Narayandas Honorary secretary of the above sanatorium at his office at 1 Hammam street Fort Bombay.

Dated this 7 th day of October 1915.

## नोटीस

रा. त्रिंबक नरसिंह देशमुख रा० आकोट यांसः—

( खालीं सही करणार याजकडून ) नोटीस देतो ऐसाजे तुह्मास कुलमुखत्यारपत्र दिले होते ते कुलमुखत्यारपत्र ता. १ माहे मे सन १९१५ इ॥ पासून रद्द केलें आहे सबब नोटिसीनें जाहीर केलें आहे व माझे नांवचे माझे सहीचे कोरे कागद आहेत ते रद्द असे ता. २४–९–१५ इ॥

सही

राजेरतनसिंग बेनीसिंग दस्तूर खुद्द.

नो० नं० ३७७

## नोटीस

नोटीस बेशमी नारायणसा आत्मारामसा भवसार सराफ दुकान कसब नांदुरा बु॥ ता० मलकापूर जि० बुलढाणा.

यांस —

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी मजजवळून स्थावर मालाचे खरेदीखत लिहून घेऊन ते नोंदुन घेतलें आहे. व त्यांतील ज्या रकमांचा तुह्मी हवाला घेतला त्या रकमा त्या लोकांना दिल्या नाहीं व नगदी सबरजिस्टार समोर जो भर्णा दिला तोही तुह्मी कचेरींतून मी बाहेर निघालों त्यावेळेस वापस घेऊन गेले, व प्रामिसरी नोटही मजला रजिस्टार समोर दिलेल्या रकमेचा तुमचे घरीं माझे नांवानीं लिहून दिला ती प्रामिसरी नोटही तुह्मी पंधरा दिवसानीं घेऊन गेले व त्याची रकम देतो अशी थाप दिल्यावरून तह्मांस या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटिस पावल्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आंत ज्या स्थावर मालाचे खरेदीखत तुमचे नांवानें करून घेतलें त्याचे खरेदीखत माझे नांवानें उलट करून देणें तसें न केल्यास तुमचेवर योग्य तजवीज केली जाईल. व विश्वासघात केल्याबद्दलही काम चालविण्यांत येईल हें खुप समजावे. आणि मी तुमचे कोणतेच रकमेचा जबाबदार नाहीं व ती मजला कबुल नाहीं व तुह्मास करून दिलेलें खरेदीखत फोलसमजलें जाईल. तुह्मी ज्या सावकाराची रकम लावून घेतली त्याच्या पैशाचा निकाल होईपर्यंत त्या रकमेच्या व्याजाबद्दल जबाबदार तुह्मी व्हाल. नोटीशीचा खर्च व पुढें कोर्टास लागणारा खर्चासु॥ सर्व रकम तुमचे कडून घेण्यांत येईल, कळावें तारीख ७-१०-१९१५ इ.

द. गोविंदा वा॥ सखाराम भोगे द॥ खु॥

सही.

गणु वा॥ विठू तायळे नांदूरा नि० आं० खुद.

नौ० नं० ३७६

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता, कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार. मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दिपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून [illegible] पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. [illegible] का रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७[illegible] गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

[illegible]. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांतील सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची लाली, संकोच, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

नो० नं० ३६९

पुरवणी—वऱ्हाडसमाचार ता० ११ आक्टोबर १९१५

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना.

### ए. जे. ह्मात्रे आणि सन सुगंधी.

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदिर भुलेश्वर - मुंबई.

एकच भाव! ओटो सुरंगीं ! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

### ओटो सुरंगी

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत अरगजा व कितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ १० आ १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4½ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,9718 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,89 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,86,509 |

### BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitntes a record for the company. The next Division of profits will be made at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund,
divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
NagPUr.

N. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें